शनिवार । २७ जुलै १९७४
एक रुपया

# माणूस



## एक ऑगस्ट मोर्चा व्रतनिश्चय हवा

**पु. ल. देशपांडे**

---

- मोर्चा मंडईजवळील टिळक पुतळ्यापासून सकाळी साडेआठला निघत आहे.
- शनिवारवाड्यापर्यंत पोचल्यावर तेथे दिवसभर उपोषण.
- संध्याकाळी मिरवणूक व सभा.
- प्रमुख निमंत्रक अण्णासाहेब सहस्रबुद्धे.
- उपोषणामुळे वाचणारी एकवेळच्या आपल्या जेवणखर्चाची रक्कम जमा करून बिहार आंदोलनाला मदत म्हणून जयप्रकाशांकडे पाठवावी अशी एक नवीन सूचना मुंबईहून रघू दंडवते यांनी पाठविली आहे.

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २७ जुलै | अंक : नववा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


पुणे-४
१५ जुलै ७४

श्री. प्रभाकर पाध्ये यांस स. न.

श्री. जयप्रकाश नारायण यांनी सुरू केलेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाला, १ ऑगस्ट रोजी उपोषण करून जनतेने आपला पाठिंबा दर्शवावा असे आपण आणि पुण्यातल्या आणखी काही नागरिकांनी आवाहन केले आहे. त्या पत्रकावर मी अनुमतीदर्शक सही केलेली आहे. १ ऑगस्ट रोजी मला पुण्यात राहाणे पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे शक्य होणार नसल्याने सहानुभूती निदर्शक मोर्च्यात मला भाग घेता येणार नाही याबद्दल दिलगीर आहे. भारतातील लोकशाहीच्या आत्म्याचे रक्षण करणे हा जयप्रकाशजीच्या आंदोलनामागील हेतू आहे ह्या अनुषगाने श्री. बाबा आमटे यांनी आजच्या राजकारणाला 'मतपेटीशी चालवलेले प्रणयाराधन' असे म्हटले होते त्याची आठवण झाली. 'युद्ध आणि प्रेम' ह्यात यशस्वी होण्यासाठी काहीही केले तरी चालते अशा अर्थाची इंग्रजीत जी म्हण आहे तिचा प्रत्यय सध्या मतपेटीशी चाललेल्या प्रणयाराधनाच्या बाबतीतही येतो. लोकशाहीचा आत्मा किडण्याचे मुख्य कारण राजकीय निवडणुकात यशस्वी होण्यासाठी चालवलेला सर्व तऱ्हेचा भ्रष्टाचार हेच आहे असे मला वाटते. राष्ट्राला खिळखिळे करून टाकणारे जातीय आणि प्रांतीय द्वेष, त्यासाठी जागवण्यात येणारे आजच्या जीवनातील अत्यंत असबद्ध असे अहंकार, प्रचारासाठी द्रव्य हवे म्हणून नफेखोराशी केलेल्या तडजोडी, केवळ स्वपक्षाचे बहुमत व्हावे म्हणून धर्मांध आणि अराष्ट्रीय गटाशी चालविलेला राष्ट्रविघातक अनुनय हीच मुख्यतः ह्या भ्रष्टाचाराच्या कर्करोगाच्या मुळाशी असलेली कारणे आहेत. निःस्पृह सरकारी अधिकाऱ्यांची उचलबांगडी होते, आणि भ्रष्ट सत्ताधाऱ्यांशी सूत जमवणारे लाचखाऊ अधिकारी आणि राजकीय पुढाऱ्यांचे दलाल निर्भयपणानेच नव्हे तर मानसन्मानाने वावरताना आढळतात. भ्रष्टाचार ही जणू काय ह्या देशात अपरिहार्य गोष्ट आहे अशी श्रद्धा बळावू लागली आहे. साध्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकापासून ते संसदेच्या निवडणुकापर्यंत निवडणुकीसाठी अपरंपार पैसा ओतावा लागतो हे आता गृहीतच धरले जाऊ लागले आहे. परिस्थितीच अशी आहे की आपण सारेजण जाणून किंवा अजाणता ह्या भ्रष्टाचारात भागीदार होत आहोत. अशावेळी उपोषण किंवा मोर्चा अशा नैमित्तिक कार्यक्रमांप्रमाणे काही नित्य कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. राष्ट्रीय चळवळीत म. गांधींनी परदेशी कापडाच्या होळीपासून ते मिठाच्या सत्याग्रहापर्यंत अनेक लहानमोठे कार्यक्रम लोकांना दिले होते. व्रतांच्या भावनेने त्याकाळी बहुसंख्य लोकांनी हे कार्यक्रम स्वीकारले होते.

भ्रष्टाचार विरोधी मोहिमेत सहभागी होण्यासाठी आज आपल्या समाजाला अशी व्रते देता येणे शक्य होणार नाही का? एक उदाहरण म्हणून सांगतो. हल्ली जवळ जवळ रोज आपण खेड्यापाड्यातून बुद्धवाड्यातल्या आणि तत्सम वस्त्यातल्या नागरिकांवर अमानुष हल्ले झाल्याच्या बातम्या वाचतो. दिवसेंदिवस हे प्रकार वाढतच चाललेले दिसतात. आपल्याच देशातल्या माणसांना साध्या माणसासारखा जगण्याचा अधिकार मिळू नये यासारखा लोकशाहीची कल्पनाच मुळात उखडून टाकणारा मला दुसरा कोणताच भ्रष्टाचार दिसत नाही. आपल्या पत्रकावर सह्या करणारांनी स्वतःच्या पक्षातील लोकांना 'एक गाव-एक पाणवठा' ही चळवळ लोकशाहीतल्या एका भयंकर भ्रष्टाचाराच्या प्रकाराविरुद्धची चळवळ म्हणून तिचा स्वीकार करायला का सांगू नये? गेल्या वर्षी मुंबईतल्या एका विठ्ठल मंदिरात आषाढी एकादशीच्या दिवशी हरिजन जोडप्याकडून पूजा करवण्यात आली. हा एक प्रतीक म्हणून काहीतरी करण्याचा भाग आहे. तसे एक दिवसाचे उपोषण हेही प्रतीकच आहे. मग यंदाच्या कार्तिकीला पंढरपुरातल्या विठ्ठलाची पूजा तिथल्याच एखाद्या हरिजन कुटुंबाकडून करून घ्यायला काय हरकत आहे? ज्यांच्यावर शतकानुशतके अन्याय झाले आणि आजही होत आहेत त्यांच्यापुढे पश्चात्तापाने मने धुवून स्नेहाची भिक्षा मागायची संधी अजूनही गेली आहे असे मला वाटत नाही.

त्याचप्रमाणे भ्रष्टाचाराने ज्यांचे हात बरबटले आहेत असे मंत्री मोठ्या बडेजावाने जिथे आणले जातात अशा समारंभावर बहिष्कार टाकणे अशक्य नाही.

**जयप्रकाशांनी सुरू केलेल्या भ्रष्टाचार, महागाई, बेकारी विरोधी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुण्यात येत्या एक ऑगस्टला युवक-नागरिक स्त्रीपुरुषांचा मोर्चा व उपोषण असा एक कार्यक्रम ठरविण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाचे एक निमंत्रक श्री. प्रभाकर पाध्ये यांना श्री. पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेले हे पत्र....**

---

सामान्य माणसाच्या जीवनाला आवश्यक अशा तेल, डाळ, तांदूळ, ज्वारी, बाजरी, तिखट-मीठ किंवा साध्या पाव-उसळीच्या किमती जोपर्यंत सत्तर-ऐंशी टक्क्यांनी उतरत नाहीत तोपर्यंत लग्नातल्या जवणावळींना हजर राहणार नाही असे व्रत घ्यायला काय हरकत आहे?

लग्नातले स्वागत समारंभ ह्या नावाखाली मोठमोठ्या पदावरच्या लोकांना अहेरांच्या रूपाने लाच दिली जाते. तिचा उघड निषेध म्हणून ज्या लग्नात अहेर घेतला जातो अशा लग्नाना न जाणे एवढी साधी गोष्ट करता येणार नाही का? वेळी अवेळी बहुजन समाजाच्या दुःखाच्या आणि मानवतेच्या गप्पा सांगणाऱ्या, राजकारणी आणि व्यापारीच नव्हे तर साहित्यिकांच्याही घरच्या लग्नातली आरास आणि श्रीमंती मिरवण्याची निर्लज्ज हौस आपण सगळेच पाहातो. कोडगे-पणाने भरमसाट हुंडे मागणाऱ्यांच्यात राजकीय पुढारीच नव्हेत तर न्यायाधीश, समाजसुधारक, साहित्यिक-कवी सगळे आहेत. जुन्या पिढीला सतत – आणि पुष्कळ वेळेला रास्त दूषणे देणारे युवक वराच्या भूमिकेत आल्यावर ह्या कोडग्या व्यवहाराचे भागीदारही होताना दिसतात.

मला फार मोठी क्राती वगैरे कशी करतात त्याविषयी काहीही ज्ञान नाही. पण हुंड्यापायी आजच्या जमान्यातही उतरत्या वयात कर्जाचा नवा डोंगर डोक्यावर घ्यावे लागलेले मुलीचे बाप पाहिले आणि त्या बापाचे हाल पाहूनही दिल्या घरी सुखाने नांदायला जाणाऱ्या चांगल्या एम्. एस्. सी. आणि पी. एच्. डी. झालेल्या मुली पाहिल्या की त्या मोठ्या क्रातीची वाट पहाण्यापलीकडे आपल्या हाती हा भ्रष्टाचार थांबवण्याचे काहीच शस्त्र उरले नाही का?–हा प्रश्न सतावतो.

आज सार्वजनिक रुग्णालयातून गरीब रोग्याना मिळणारी वागणूक ह्या देशात लोकशाही नसल्याचेच द्योतक आहे. सरकारी कचेऱ्यातून तर सुशिक्षिताचीही दाद लागत नाही. मामलेदार कचेऱ्या आणि कलेक्टर कचेऱ्यांच्या बाहेर, हवे असलेले कागद आणि दाखले मिळवायला येणाऱ्या गरीब शेतकऱ्यांना कचेऱ्याबाहेरच्या अंगणात, भर उन्हात तासन्तास तिष्ठावे लागते. ही सारी दृश्ये म्हणजे चिंध्या होत चाललेल्या लोकशाहीचेच पुरावे आहेत. 'न्यायाचे राज्य उरले नाही' ही ज्याच्या त्याच्या मनात भावना आहे. इग्रज येण्यापूर्वी हीच भावना होती हे इतिहास आणि ऐतिहासिक व्यक्तींविषयी आंधळा अभिमान बाजूला सारून तत्कालीन कागदपत्रे पाहिल्यावर कळून येते. जयप्रकाशजींची चळवळ म्हणजे आजच्या राज्यकर्त्यांना 'सावध व्हा, सावध व्हा' हे सांगणारी चळवळ आहे. सारे आयुष्य ज्या माणसाने इतक्या स्वार्थनिरपेक्ष वृत्तीने झिजवून देशाच्या भल्याच्या कारणी लावले त्याला उतरत्या वयात आणि शरिराच्या असल्या व्याधिग्रस्त अवस्थेत स्वदेशी राज्यकर्त्यांनाच जागे करण्यासाठी जिवावर इतके उदार होऊन उभे राहवे लागते आहे ही आपणा सगळ्यानाच लाज वाटावी अशी गोष्ट आहे. वैयक्तिक वैराच्या पलीकडे गेलेल्या ह्या थोर माणसाच्या शुद्ध हेतूविषयी आज नाना प्रकारच्या पार्श्वद्वारातून सत्तेच्या जागी बसलेले लोक आणि त्यांचे संधिसाधू खुशामतये शंका घेत आहेत. वैचारिक अधःपाताची ही कमाल आहे.

अशा वेळी लोकशाहीत आपण निर्भयपणाने जगू शकू असा विश्वास जनतेत निर्माण करणारी लहानसहान व्रतेही मला मोलाची वाटतात. स्वार्थ कुणालाच सुटला नाही. पण अनेकांच्या स्वार्थत्यागातून मिळालेले हे स्वातंत्र्य – म्हणजेच न्यायाचे राज्य टिकवण्यासाठी ह्या स्वार्थाला थोड्याफार प्रमाणात तरी पायबंद घालून, जीवनातल्या कुठल्यातरी सार्वजनिक दुःखाचा नाश व्हावा म्हणून एखाद्या सामाजिक मोक्षासाठी करायच्या ऐहिक व्रताने स्वतःला बांधून घेणे अशक्यच आहे का?

आपला

**पु. ल. देशपांडे**

---

मुंबई विद्यापीठासंबंधीचा दुसरा 'स्फोट लेख' वेळेवर हाती न आल्याने या अंकी दिला नाही.

# योगिनी - वियोगिनी

## सौ. सुमती देवस्थळे

आईबापावेगळ्या दोन पोरक्या पोरी. अत्यंत निरागस. कोवळ्या वयाच्या. एक होती ७ वर्षांची नि दुसरी ५ वर्षांची. या मुलींची जबाबदारी कोण घेणार? मग शेजाऱ्यापाजाऱ्यांना त्यांच्या श्रीमंत नातेवाईकाची आठवण आली. काउंट इल्या टॉलस्टॉय (लिओ टॉलस्टॉयचे आजोबा) कझानचे गव्हर्नर होते. मोठे प्रतिष्ठित, दिलदार गृहस्थ. त्यांच्या घरात गोकुळ नांदत होते. त्या घरात या पोरी काही जड झाल्या नसत्या. काउंटेसच्या माहेरच्या नात्याचा कुठलासा दूरचा तंतू पकडून मुलींना टॉलस्टॉय कुटुंबात आणण्यात आले. गृहस्वामिनी जरा व्यवहारी होती. तिने स्वतःच्या सधन बहिणीला बोलावले अन् दोघींनी मिळून या निरागस पोरक्या मुलींची जबाबदारी घ्यायचे ठरले.

कोणती मुलगी कुठे राहील?... असले प्रश्न सोडविण्याची साधी पद्धत चिठ्ठ्या टाकायच्या. तशा त्या पवित्र क्रॉससमोर टाकल्या. दोघी गर्भश्रीमंत बहिणींनी एकेक चिठ्ठी उचलली. चिठ्ठीत जिचे नाव आले, तिला सांभाळणे हा परमेश्वरी आदेश मानून त्यांनी स्वीकारला. परमेश्वराने दिलेल्या कौलानुसार तात्याना अलेक्झॅण्ड्रोव्हॅना इर्गोल्स्काया ही धाकटी बहीण टॉलस्टॉय कुटुंबाकडे आली. वय जेमतेम ५ वर्षांचे. इतक्या कोवळ्या वयात मोठ्या बहिणीचा एकमेव आधार तुटला. आईवडिलांच्या मृत्यूचा आघात तिला समजला नव्हता. पण मोठ्या बहिणीपासून दुरावताना मात्र भावनेचे कढ आवरत नव्हते. त्यांच्या डोळ्यांच्या कडा लालसर झाल्या होत्या. पण गत्यंतर नव्हते. पोरवयात पोक्तपणा आला. समजसपणा आला, अन् प्राक्तन निमूटपणे सहन करण्याची बालमनाने तयारी केली.

तात्याना अलेक्झॅण्ड्रोव्हॅना ही अत्यंत संवेदनाशील मुलगी होती. आपण अनाथ आहोत–एकदम प्रतिष्ठित घरात आलो आहोत–इथे समरस व्हायला हवे. अन् त्यासाठी काही खास गुण दाखवावे लागतील. नाही तर आपली गणना नोकरवर्गात व्हायची! गुणांनी या घरातील मुलांना जिंकायला हवे; आपले अस्तित्व, महत्त्व, व्यक्त करायला हवे याची अस्फुट कल्पना त्या मुलीला होती. एवढीशी ५-६ वर्षांची पोर! काय गुण दाखवणार? कामे तरी काय करणार? घरात ५०-६० नोकर वावरत होते. सारा संस्थानिकी कारभार! मग हिला काम तरी काय असणार? टॉलस्टॉय घराण्यातल्या दोघी मुली थोड्याशा मोठ्या होत्या. निकोलस् एकुलता एक मुलगा–हा मात्र तिच्या बरोबरचा होता. त्याने आपल्याला खेळायला घ्यावे, बरोबरीने वागवावे हा तिचा अट्टाहास! निकोलस्‌ला तिची ही उत्कट इच्छा कधीही जाणवली नाही. तो आपल्याबरोबरीच्या मुलात दंग असे. मुली म्हणजे काय, अगदी मुळूमुळू रडणाऱ्या–बावळट! त्यांना कोण घेतय् खेळायला? त्यांनी भातुकली खेळत बसावे खुशाल! ही निकोलस्‌ची भूमिका. त्यामुळे तात्यानाला त्याच्याशी खेळता येत नसे.

एकदा सर्व मुले खेळून दमली होती. खेळ झाल्यावर गप्पा. ऐतिहासिक शूरांच्या गोष्टी सुरू झाल्या. पूर्वीची माणसे कशी निर्धार करून कोणतेही अक्रीत करून दाखवीत, ते कसे निधड्या छातीचे होते, वाटेल त्या यातना सहन करीत... अन् आपण मात्र जरा कुठे खरचटले की ओरडत बसतो... यावर चर्चा सुरू होती. ७-८ वर्षांची तात्याना तिथेच होती. ती म्हणाली, 'अरे निकोलस् त्यात विशेष ते काय? ठरविलेच तर आपणही वाटेल ते करून दाखवू! आहे काय त्यात मोठेसे?'

'नुसती तोंडाची वाफ नको वर! काय ग पाकोळी, तू तापलेली सळई हाती धरून दाखवशील?'

'होऽ! धरायचीच असं ठरविलं, तर जरूर धरून दाखवीन!'

'दाखव बघू!'

'आण बघू ('... तिने आव्हान स्वीकारले. निकोलस्‌ने नोकराकडून एक सळई लालीलाल तापवून आणविली. अन् धर म्हणताच तिने सरळ ती हाती धरली. मन घट्ट करून तो आगडोंब कोवळ्या हाताच्या मुठीत घट्ट पकडला. त्या लालभडक सळईने तळव्याचे मांस चुरचुरले, जळाले, वास आला–पण त्या पाकोळीसारख्या नाजूक किशोरीने तोंडातून ब्र काढला नाही. सगळी मुलं अवाक्! काय लोकविलक्षण घडतय्! एवढ्याशा मुलीच्या ठायी एवढे धारिष्ट? नोकरमंडळीही बघतच राहिली! शेवटी निकोलस् ओरडला, 'अग सोड–टाकना खाली ती सळई!'

खण्‌ण्...सळई खाली पडली. कातडे सळईला सोलवटून निघाले. मांस करपले–पण मुलीने तोंडातून ब्र काढला नाही. असामान्य मनोधैर्याची ती जळकी खूण जन्मभर हातावर कोरली गेली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे निकोलस् तिचे मनोधैर्य पाहून चकित झाला. ही मुलगी इतरासारखी नाही–हळूबाई नाही, धारिष्ट्याची आहे–वेगळी आहे–चांगली आहे, तेव्हा तिला आपल्यात खेळायला घ्यायला काहीच हरकत नाही, असे त्याने ठरवून टाकले. अन् मग त्या अग्निदिव्यापासून ती आश्रित पोर घरचीच बनून गेली–सामावून गेली.

टॉलस्टॉय कुटुंबात तिच्याहून दोघी मोठ्या मुली होत्या. १९ व्या शतकाच्या अगदी सुरुवातीचा काळ–मुलींची लग्ने लवकर करण्याची प्रथा रशियातही होती. मोठी अलेक्झॅंड्रा लग्नाची होती. इल्या टॉलस्टॉयना काही धास्ती वाटत नव्हती. ते मोठे प्रतिष्ठित, उदार प्रसिद्ध आसामी–त्यांनी उत्तम काउंट जावई पाहिला. पण दैव धड नव्हते! जावई जवळ जवळ वेडा निघाला. आपल्यामागे कोणीतरी धावते आहे, पाठलाग करते आहे, आपल्या खुनाचा प्रयत्न होतो

आहे या काल्पनिक भीतीने (Persecution magia) तो सतत पछाडलेला होता. त्यापायी पोरीला अति त्रास झाला. अखेर काउटला वेडयाच्या इस्पितळातच ठेवावे लागले होते. दुसरी मुलगी पेलाग्या हीसुद्धा आता मोठी झालेली होती-तात्यानाही नवथर तारुण्याच्या तजेल्याने उमटून दिसत होती. पण किती केले तरी मोठ्या माणसाच्या दृष्टीने ती आश्रीतच ! तिच्याकडे कोण एवढे लक्ष देते आहे ? सर्वांचे लक्ष निकोलस्‌वर केंद्रित झालेले होते. तो वशाचा दिवा होता. त्याचे लहरते वहरते तारुण्य दिसामाशी व्यक्त होत होते. तो सोळा वर्षांचा झाला. त्या काळच्या रीतीरिवाजानुसार चागला वयात आला. त्याला जीवनाची सर्वांगीने ओळख व्हावी म्हणून वडिलांनीच एका गुलाम मुलीशी सबध जोडून दिला. ही गोष्ट त्या काळात सर्वमान्य होती. त्यात नवल काहीच नव्हते. तात्याना निकोलस्‌च्या बरोबरीची. तिलाही नवथर तारुण्याचा अननुभूत प्रत्यय येतच होता निकोलस्‌ तिला फार आवडत असे. श्रीमत, रुबाबदार, शूर लढवय्या असा तर तो होताच, पण तात्यानाच्या प्रेमवेडया मनाला त्याच्या ठिकाणी आणखी केवढया तरी गुणराशी दिसत असत लवकरच तो तिच्या प्रत्येक कृतीचा ध्रुवतारा बनला त्याची आवडनिवड हीच तिची प्रेरणा ठरली. त्याच्यासाठी सारा साजशृगार करायचा, त्याच्या सहवासाचे स्वप्नशिल्प मनात कोरीत राहायचे हाच तिचा ध्यास !

इ.स.१८१२-नेपोलियनची रशियावर स्वारी-टॉलस्टॉय घराण्याचा एकमेव कुलदीप घरात स्थिरावला नाही लवकरच निकोलसने रुद्रकरुण युद्धभूमीकडे प्रयाण केले निकोलसचे स्मृतिशिल्प मनोमनी जपत तात्याना वावरत होती. त्याच्या विरहात तिने आपला सारा साजशृगार उतरवून ठेवला. तो सुरक्षित परत यावा म्हणून तिने किती व्रतेवैकल्ये केली असतील. त्याच्या खुशालीच्या पत्रावर तिचे चित्त दोलाचल होत होते. प्रत्येक घास अश्रूबरोबर उतरत होता. रक्त गोठून टाकणारी धास्ती ! तिची झुरणारी प्रीत, क्षणोक्षणी होणारी विमनस्क उलघाल घरातल्या मडळींच्या नजरेस आली. पण त्याकडे कोणीही फारसे लक्ष दिले नाही. पेलाग्याच्या लग्नाचे पहायला हवे होते. निकोलसची काळजी वाझोटी होती-त्यात मन-शक्ती आटविण्यात काय अर्थ होता ? बाकी पेलाग्याच्या लग्नाचीही आईबापाना तशी काळजी नव्हतीच कझानमधला गर्भश्रीमत काउट युष्कोव्ह हल्ली टॉलस्टॉय कुटुबात वारवार येऊ लागलेला होता. आणि त्याच्या येण्याचे कारण सर्वानी गृहीत धरलेले होते

पण वस्तुस्थिती वेगळीच होती. काउट येत होता खरा, पण तो पेलाग्यासाठी नव्हे ! त्याचे लक्ष तात्याना अलेक्झॅण्ड्रोव्हॅनावर स्थिरावले होते. तिचे टपोरे, भावपूर्ण डोळे, कुरळे लाबसडक केस, रेखीव बाधा अन लवचिक हालचाल त्याला मोहून टाकीत होती. तात्याना बुद्धिमान होती, कष्टाळू होती आणि अनेक सद्‌गुणांची पुतळी होती. मात्र त्या कस्तुरी मृगीला आपल्या ठायीच्या कस्तुरीची जाणीव नव्हती. निकोलस नामक मृगजळाचाच तिने ध्यास घेतलेला होता. घरात वारवार खेटे घालणारा युष्कोव्ह आपल्यावर नजर ठेवून असेल याची कल्पनाही तिला नव्हती. मनाने तिने निकोलसला वरले होते. सावित्री फक्त सत्यवानाची होती...त्याचाच ध्यास ! बाकी सारे नगण्य ! बाकी कशाला अस्तित्त्वच नव्हते-तो सुखरूप असू दे-परत येऊ दे-मला लाभू दे-बस्‌ ! दुसरे काही नको ! युष्कोव्हला तिची ही भाववेडी मनस्थिती माहीतच नव्हती. त्याने तिला आपला मनोदय कळविला. ती बावरली-अवाक् झाली-मागणी झुरळासारखी झिडकारून मोकळी झाली युष्कोव्ह ? पिढीजात काऊट ? छे ! त्याचा विचारच नको. माझा निकोलस येईल-तोच माझा आहे-बाकी कोणाचाही विचार अप्रस्तुत ! हीच तिची भूमिका.

पेलाग्याचा अहकार खूप दुखावला आपल्याला मागणी घालायची सोडून आश्रिताला मागणी घालायची-हा सरळ अपमान होता. त्यातूनही नकार मिळाल्यामुळे पुनश्च पेलाग्याचा अनुनय करणे हे तर अगदीच 'व्यावहारिक' स्तरावरचे होते ! पण मोठ्यामडळींना ही अतर्गत स्पर्धेची चक्रे माहीत नव्हती. म्हणून त्यांनी युष्कोव्हशी तिचे लग्न लावून टाकले. निकोलस रणभूमीवर होता-अद्याप रणकदन सुरू झालेले नव्हते, पण नेपोलियन कधी डरकाळी फोडील याचा नेम नव्हता.

याच सुमारास टॉलस्टॉय कुटुंब अकल्पित सकटांच्या वादळवाऱ्याने उन्मळून गेले. इल्या टॉलस्टॉय याचा कारभार वारेमाप असे. त्याच्यावर अफरातफरीचा आरोप ठेवला गेला-त्या चौकशीसाठी खास समिती नेमण्याचा फतवा निघाला हे कळताच इल्या टॉलस्टॉय गडबडून गेले ! तत्कालीन व्यवहार पहाता त्यानी इतके विमनस्क होण्याचे काहीच कारण नव्हते. त्याच्या हातून अति औदार्यापायी घडलेली चूक निस्तरण्याजोगी खास होती. परतु आपल्या हाताखालची माणसे आपल्या वाईटावर आहेत, आपल्याला गोत्यात आणण्याच्या प्रयत्नात आहेत ही गोष्ट त्या दिलदारमनाच्या इल्या टॉलस्टॉयना सहन झाली नाही. महिन्याच्या आतच त्यानी देह ठेवला. (आत्महत्त्या केली असाही प्रवाद आहे)

कुटुंबप्रमुख गेला. एक खांबीतबू डळमळला तो सावरण्यासाठी निकोलसला युद्धभूमीवरून तातडीने परतावे लागले. जेमतेम २०-२१ व्या वर्षीच निकोलसवर सबध ससाराची जबाबदारी पडली. वडील भलतेच प्रतिष्ठित-नोकराचा लवाजमा-अतोनात खर्च ! आईला साऱ्या श्रीमती सवयी ! ऐशारामाची सवय ! काटछाट करायची कशी अन् कुठे ? निकोलसने एकूण एक अनावश्यक खर्चांना काट दिली नोकराचाकराचा बोजड लवाजमा काढून टाकला. अवाढव्य पसारा आवरून बेताची वेगळी जागा घेतली. घरात आई, तात्याना अन् तो स्वत.-रीतीपुरेसे २-४ नोकर. बस्! मिळाली ती मुलकी नोकरी धरली. पगार अपुरा. वडिलार्जित कर्ज फिटणे शक्यच नव्हते-मग त्याने वडिलांचा सर्वच वारसा नाकारला. (कर्जसुद्धा नाकारले) आणि घराचा कोसळलेला डोलारा सावरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. तात्यानाने या उपक्रमात सिंहाचा वाटा उचलला होता. ती सतत कष्टत होती. आळस, अगचोरपणा कसा तो तिला माहीतच नव्हता. ज्यामुळे निकोलसला बरे वाटेल ते करायचे हे तिच्या वागण्याचे मुख्य सूत्र त्याची प्रसन्नता हा तिचा ध्रुवतारा. त्या दिशेने जायचे ही खूणगाठ ! तिने त्याला मनाने वरले होते; तेव्हा त्याच्या सुखातच तिचे सुख सामावलेले होते त्याच्या आईला प्रसन्न ठेवणे ही गोष्ट काही सोपी नव्हती. आधीच पतिनिधनाचे दुःख, त्यात अकस्मात गरिबी, अन् वर अप्रतिष्ठेचे

मीठ ! तिच्या लहरीपणाच्या मर्यादा नेहमी सुटत—तऱ्हेवाईकपणा चालायचा. तरीही ती निकोलसची आई आहे एवढी गोष्ट लक्षात ठेवून तात्याना वागत असे. आज ना उद्या तो आपल्याला मागणी घालणार याबद्दल ती अगदी निश्चित होती. आपली अबोल प्रीती तो केव्हा जाणून घेतो, एवढेच पहायचे होते. सावित्री सत्यवानाची निःसदेह मनाने मानसपूजा करीत होती.या भावर्वेडीच्या अनुनयाविषयी निकोलस सजग नव्हता असे नाही. पण एकूण तो व्यवहारीच खरा ? पैशाची सोंगे करता येत नाहीत—हे त्याने नुकतेच अनुभवले होते ससाराचा खचलेला डोलारा आवरायचा, तर पैशाचा भक्कम पाया हवा होता आणि त्यासाठी श्रीमत वधू निवडणे हाच एक मार्ग होता. नातेवाईक श्रीमत वधूच्या शोधात होते. नववधूबरोबर लक्ष्मी घरात यायला हवी होती—सारे ससारिक ताण अशा मार्गाने सैल, सुसह्य करायचे होते.

निकोलससाठी अशा तऱ्हेची वधू शोधून काढणे हा तात्यानावर सरळ अन्याय होता. इतकी देखणी, प्रेमळ, कर्तबगार अन् घरात रुळलेली मुलगी नाकारायची ? जिच्या प्रत्येक श्वासातून निकोलस-विषयीची निष्ठा व्यक्त होत होती, तिला नकार द्यायचा ?...पण तात्यानाने ही निराशा धीटपणे स्वीकारली. श्रीमत वधूमुळे तिचा निकोलस सुखी होणार होता ना ? त्याच्या आपदा सपणार होत्या ना ? ठीक ! मग तेच करायला हवे. मग ही सावित्री मनोमन वरलेल्या सत्यवानाशी अतर ठेवूनच वावरू लागली. अर्थस्य पुरुषो दास. हे विश्वसत्य त्या अल्लड पोरीला अशा भयानक स्वरुपात समजावून घ्यावे लागले. ज्यात त्याचे सुख, त्यातच आपले सुख मानायचे अशी शिस्त तिने स्वत च्या कातर मनाला कायमची लावून टाकली. सावित्रीच्या सुखाचे याहून वेगळे स्वरूप सभवच नाही ! आपले सारे सुखस्वप्न होमून टाकून ती मनाने योगिनी बनली.

निकोलसची पत्नी मार्या व्होल्कॉन्स्की दिसायला अगदीच ओबड-धोबड, कुरुपात जमा अशी होती. वय वर्षे ३२. ही का नववधू म्हणायची ? पण आता ते सारे निरासक्त मनाने, साक्षित्वाने पहात राहायचे होते. आपल्या मनातला विषाद कायमचा पुसून टाकायचा होता मार्या कुरुप असली, तरी स्वभावाने अतिशय नम्र, सुशील, सात्त्विक अशी होती. तिच्याशी भाडणतटा करायचे ठरविले तरी अशक्य होते ! खेरीज तिने टॉलस्टॉय कुटुंबात येताना बरोबर शेकडो गुलाम, प्रचड शेती, मोठाथोरला बगला, व भरपूर पैसा आणलेला होता. निकोलसचा आर्थिक प्रश्न पूर्णपणे सुटला होता. अपरपार वैभवाचा तो धनी बनला होता. भराभर मुले होत गेली. ६ वर्षात चार मुलगे झाले. त्यामुळे तिला घरात लक्ष देता येत नसे. तात्याना घराची सारी व्यवस्था चोख पहात असे. मार्याची प्रकृती नाजूक होती. पुनश्च दिवस राहिले. आता आई मुलांच्या वाट्याला येईनाशी झाली. तिला विश्राती मिळावी म्हणून तात्याना मुलाना आईपासून जरासे दूर ठेतीत असे. मुले सारखी आत्याच्या भोवती घोटाळायची आई पाचव्या वेळी प्रसूत झाली. नवजात बालिके बरोबर नवा रोगही सुरू झाला. मार्या अथरुणाला खिळली आणि अखेर ५ महिन्याच्या मुलीला सोडून देवाघरी गेली. आई गेली तेव्हा काउट लिओ निकोल्विच टॉलस्टॉय अवघा पावण दोन वर्षांचा होता. निकोलसच्या फळत्याफुलत्या ससाराला अशी दृष्ट लागली. ही पाच चिल्ली पिल्ली कशी साभाळायची हा प्रश्न होता. निकोलस सैरभैर झाला होता.

आईच्या मृत्यूचे मुलांना फारसे दु ख झालेच नाही. लिओला तर काय झाले तेही समजले नाही. आईच्या पाचव्या गर्भारपणापासूनच तो आत्याच्या भोवती घोटाळायला सरावला होता. प्रत्येक लहान-सहान गोष्टीसाठी त्याला आत्याच हवी असायची त्यालाच का ? प्रत्येकालाच ती हवी असे. सर्वांना तिचा लळा. तिचाही त्यांच्यावर जीव ! कारण ती मुले म्हणजे निकोलसच्या प्रतिकृती होत्या. प्राणप्रीय निकोलसची मुले ! तीही तितकीच प्रीय ! त्याने प्रेम दिले नाही पण त्याची निष्पाप मुले आत्याला भरभरून प्रेम देत होती, परोपरीने आत्मीयतेचे धागे गुतवीत होती. तिची मुलावरची माया पाहून निकोलसने तिला मागणी घालायचे ठरविले. हजार-वेळा ओठावर आलेले शब्द सकोचाने गोठून जात वाचा काम देईना ! ऐन उमेदीत जिचा मनोभग केला तिला आता अशा विधुरावस्थेत मागणी घालायची ?... अखेर त्याने तिला चिट्ठी लिहिली. आपले पत्नीपद स्वीकारावे आणि मुलाची जबाबदारी घ्यावी अशी विनती केली. तिने या सूचनाचा खूप विचार केला. उशीरा का होईना, पण तिचा निकोलस आता तिला लाभणार होता. स्वप्नशिल्प सजीव होणार होते

एक अडचण होती. तात्यानाने मृत्युशय्येवरील मार्याला एक वचन दिले होते. 'तुझ्या मुलाना मी नीट साभाळीन, काळजी करू नकोस !' मार्याचा जीव मुलात घुटमळत होता. तात्यानाचे अभि-वचन मिळाल्यावर ती निश्चित मनाने मृत्यूच्या पडद्याआड निघून गेली होती. निकोलसशी लग्न केले असते तर मुले 'सावत्र' झाली असती, मार्याला दिलेले वचन खऱ्या अर्थाने पुरे झाले नसते तेव्हा तिने लग्नाला नकार दिला. मुलाची जबाबदारी मात्र स्वीकारली. मरेपर्यंत तिने मुलाना अतर दिले नाही. मुलाना साभाळायला नोकरचाकर होते. शिक्षणासाठी शिक्षक होते शिकाऊ वयाची मुले ठराविक वेळापत्रकाप्रमाणे कामे करायची. लिओमात्र छोटा होता. तो आपला आत्याच्या एप्रनला धरून धरून असे. लहानपणापासूनच तो भावजीवी होता, हळवा होता. जरा कुठे बिनसले की त्याचे डोळे डबडबून जात. ते बाळरूप पाहून तिला निकोलसच्या बाळ-पणाची आठवण येई. हा दुसरा निकोलस तिच्या उतार वयात तिच्या प्रेमाश्रयाला आला होता ! सारी अर्धवट वयाची मुले. भाडाभाडी चालायची, पण सर्वांना आत्याचा शब्द प्रमाण असायचा. ती आपल्या खोलीत खाऊच्या बरण्या भरून ठेवी. चागले वागल्याची सक्रीय शाबासकी म्हणजे खाऊ ! लिओ खूश ! सारखा खाऊ हवा म्हणून तो सारख्या काही बाही चागल्या गोष्टी करीत असे. तोच त्याचा छद आत्या सोफ्यावर बसली की लिओ तिच्या मागे उबेत अगाचे मुटकुळे करून पडून राही. तिच्या माडीवर झोपून राही त्यावेळी अगावरून फिरणाऱ्या हाताच्या निळ्या ताठरलेल्या शिरा लिओला ६० व्या वर्षी सुद्धा स्पष्ट आठवत होत्या ! आत्या आपल्या केसावरून हात फिरवीत ख्रिस्ताची गोष्ट सांगत आहे, आपण तन्मय होऊन ते ख्रिस्तपुराण ऐकत आहोत, ही लिओच्या दृष्टीने त्याकाळच्या आनदाची परिसीमा होती.

काउट लिओ टॉलस्टॉय जेमतेम ८ वर्षांचा असताना यास्नायाचा परिसर सोडून शिक्षणासाठी मास्कोला बिऱ्हाड करायचे ठरले. निकोलस्च्या मुलाच्या साऱ्या सोयी पहाणे हे आत्याचे जणू नैतिक कर्तव्य बनले मास्कोला गेल्यावर घरची सर्व व्यवस्था तीच पहात असे. पैन्पैचा हिशोब लिहून ठेवी. मुलाना शिकविण्यासाठी एकदर

११ शिक्षकांच्या नेमणुका केलेल्या होत्या. कारण काउंटची मुले ही ! सर्वसामान्यासारखी शाळेत कशी जाणार ! निकोलस् मुलाच्या शिक्षणात फारसा रस घेत नसे. कधी मधी चक्कर टाकून जायचा. आत्याचे त्यामानाने पुष्कळच लक्ष असायचे. शिक्षणाची घडी व्यवस्थित बसली ! परंतु ती फार काळ टिकू मात्र शकली नाही लिओ जेमतेम ९ वर्षांचा झाला, अन् वडील अपघातात वारले अप्राप्य ध्रुवतारा कायमचा नजरेआड झाला ते दुःख आत्याला बोलून दाखविता येत नव्हते. अव्यक्तपणे धुमसत रहाणारी वेदना तिला अबोल राहून सहन करायची होती... किंचितही विमनस्कता दाखविली, तर मुले बावरून जात. घरात निकोलस्‌ची म्हातारी आई होती. एकुलत्या एक मुलाचे दुःख पहायला जशी खुरडत जगली होती ती ! तात्यानाने स्वतःला सावरले. मोठ्या मुलाना शिक्षणासाठी मास्कोत ठेवून ती धाकट्यासह यास्नायास आली. वरवर शांत राहून ती मुलांविषयीचे कर्तव्य चोखपणे पार पाडीत असे.

कालचक्र फिरत होते. निकोलसला जाऊन वर्षामागून वर्षे जात होती...पण आत्याच्या मनातले स्मृतिशिल्प जसेच्या तसे अभंग होते. निकोलस् गेला होता, पण आपली बाळरूपे मागे ठेऊन गेला होता. त्या मुलाच्या ठायीच तिला आपल्या प्रीय निकोलस्‌चा आभास होत राही. त्यातल्या त्यात लिओच्या ठिकाणी तर तिला नेहमीच निकोलस् दिसे. पुढे मुले कझानला कॉलेज शिक्षणासाठी गेली. मोठ्या मुलानी शिक्षणात समाधानकारक प्रगती केली. पण तिचा 'लिवोच्का' मात्र कॉलेजात रुळला नाही. शिक्षण अर्धवट टाकून परतला. घरी आल्यावर त्याचे सारे वागणेच बदलले. नेहेमीचा काउंटचा रुबाब नष्ट झाला. साधे सुती भोगळ कपडे घालून तो वावरत असे. हातात रूसोचे Confession ! रूसोचे शिष्यत्व इतक्या परमार्थाने स्वीकारले होते की अलिकडे लिओ रूसोची चिमुकली प्रतिमा गळयात घालून तो फिरू लागला होता. आपल्याशीच पुटपुटत राही—अमूर्त तत्त्वाचा काथ्याकूट करीत राही. ते काही तिला बरे वाटेना. लिओने पुनश्च शिक्षण चालू करावे म्हणून तिचा आग्रह सुरू असे. त्यानुसार तो कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी पुन्हा युनिव्हर्सिटीत दाखल झाला. तिकडून आत्याला नेमाने पत्रे पाठवी. चागले वागण्याचे आश्वासन देई. परीक्षेला बसणार, पदवी मिळविणार हे आत्यापाशी जाहीर करून झाले ! अन् ऐनवेळी मात्र परीक्षा अर्धीच टाकून स्वारी परतली. वर जुगारीपायी झालेले कर्ज, अन् सोबतीला दारुडा पियानोवादक.

साऱ्या बाजूनी अपेशी ठरून आलेल्या लिओला आत्याने दूर लोटले नाही तशा विमनस्क, विस्कटून गेलेल्या तरुणाला आपल्या अनुभवी मायेची ऊब दिली. तथापी तिला आपला विषाद लपविणे कठिणच गेले. बाकी कुणी तिची निराशा केली असती, तरी तिने ते दुःख कसेबसे सहन केले असते. पण तिच्या लाडक्या 'लिवोच्काने' तिची इतकी घोर निराशा करायला नको होती. ते तिच्या जिवाला फार लागून राहिले. कारण मनोमनी तिने लिओ अन् निकोलस् याच्यात अभेद मानला होता. या प्रतिमा कशा अन् कधी एकरूप झाल्या ते तिचे तिला कधी कळलेच नाही. आता या तरण्याबाड, अवखळ, धडपड्या, बुद्धिमान आणि अत्यंत संवेदनाशील लिओच्या सुखात समरस व्हायचे होते, त्याच्या हर्षामर्षानुसार तिच्या मन शांतीचा वानकुक्कुट भिरभिरत रहाणार होता. लिओ पदवी न घेता आला....जाऊ दे ! पुढे शिकेल तो पण हा पियानोवादक कशाला आलाय ? आत्याने त्या वादकमहाशयाना सरळ रजा दिली; आणि स्वतःच लिओला पियानोवादनाचे धडे देण्यास सुरुवात केली. लगेच लिओला आपण व्यावसायिक पियानोवादक होण्याचा लहर आली. तो एकसारखा पियानोच वाजवीत बसे इतक्या थराला हे संगीतप्रेम जावे हे काही आत्याला आवडले नाही तिचा निकोलस्—नव्हे लिओ—हा का नुसता वादक बनावा ? त्यात काय प्रतिष्ठा आहे ? हौस म्हणून ठीक. कला म्हणून ठीक. पण तोच व्यवसाय स्वीकारायचा म्हणजे काय ?

लिओ २२ वर्षांचा झाला....अद्याप त्याच्या जीवनाला नेमका सूर सापडला नव्हता. तो अजून निरनिराळ्या क्षेत्रात चाचपडत होता. १८५१ च्या एप्रिलमध्ये सारी भावडे यास्नायात जमली होती. 'रिकामा लिओ' हा अखड चर्चेचा विषय. त्याने काय करावे याच्या असख्य सूचना. इथे-तिथे धडपडण्यापेक्षा युद्धावर गेलेले काय वाईट ? तिकडे चागली मर्दुमकी गाजवावी ! त्यात केवढी तरी उदात्तता होती—नावलौकिक होता ! निकोलस् टॉलस्टॉय थेट नेपोलियनशी लढून आलेला शूर गडी ! त्याच्या मुलानेही त्याच क्षेत्रात मर्दुमकी गाजविण्याची कल्पना सर्वांना आवडली. आत्याची अनुमती मिळाली. अन् मग लिओ थेट कॉकेशस्‌च्या रणभूमीवर निघून गेला.

कॉकेशसहून तो आत्याला लाब लाब पत्रे लिही. त्याच्या पत्रांना काव्यात्मकतेचा रग होता. विलक्षण उत्कट अशी लय होती. ती पत्रे म्हणजे गद्यकाव्याचा आदर्श नमुना होता. आत्याला त्या पत्राचे केवढे अप्रूप ! ती पत्रे लिओची—तिच्या निकोलस्‌च्या मुलाची होती. आता दोघा पितापुत्रात तिला अभेद वाटत होता. तिची साठी आली होती. लिओ तरणाबाड, दणकट, होता.... तरीही तो तिला प्रति निकोलस् वाटत होता. लिओ तिला आपली स्वप्ने सागत होता—तपशीलवार चित्रे रगवीत होता. स्वतःच्या भावी कुटुबाचे वर्णन करून अखेर तो लिहितो...'आत्या ही सारी स्वप्ने खरी होऊ शकतील.... खरच, आशा किती मधुर असते ! आत्या, मला आता अगदी रडू कोसळतय् ग ! तुझी आठवण झाली की डोळे भरून येतात. पण ते अश्रू आनदाचे असतात ! तू माझ्यावर किती प्रेम करतेस याची जाणीव झाल्याने हृदय भरून येते !'

या प्रेमाच्या वर्षावाने आत्याला कृतकृत्य वाटत होते. तरीही तिच्या पत्रातून निराशेचा सूर उमटायचा. मी थकले आहे, आता जीवन नकोसे वाटते—मेले तर बरे होईल. अशा अर्थाचा सूर तिच्या पत्रातून वारवार ऐकू येई. निराशेची डूब घेतलेली ती पत्रे वाचली की टॉलस्टॉय बेचैन होत असे मग तो तिला युद्धाची सारी अगदी बारीक-सारीक सुद्धा माहिती कळवीत राही. तिकडच्या रासवट, लोकविलक्षण मित्राची माहिती सागे—निसर्गाची शब्दचित्रे काढून पाठवी... आत्या त्या पत्रावर जगत होती. इतकी सुदर सुदर पत्रे लिहिणारा लिवोच्का सुदर साहित्य-निर्मिती करू शकेल असे आत्याला नेहमी वाटत असे. ती त्याला तसे नेहेमी सुचवायची. आपला लिवोच्का काही फालतू, नगण्य, सपाट जीवन जगण्यासाठी जन्माला आलेला नाही हा तिचा विश्वास ! त्याने ललित साहित्य लिहावे हा तिचा आग्रह !

पृष्ठ २७ वर


भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या मंडपाचे काम घ्याल का? खर्च किती येईल?
काम घेईन! मध्यस्थीला लाच किती द्यावी लागेल, त्यावर खर्च अवलंबून आहे!


सरकारचं बाकीचं काही ऐकता का? उत्पादन वाढवा मोहिमेवरच जोर देता झालं!


राष्ट्रपतींच्या निवडणूकीत उभे रहाणार आहात की काय?
छे हो! मंगळामुळे साधा 'पति' म्हणून सुध्दा कोणी पोरगी निवड करत नाही!


एर्विन समितीचा 'वॉटर गेट' अहवाल!
श्यामजोशी-

# सोलकढी

## साहित्यसंमेलनाचे सुवर्णाध्यक्ष

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपाडे हे मराठीतले एक थोर विनोदी लेखक होऊन आहेत. पु ल. देशपाड्याच्या साहित्यिक सद्यस्थितीचे नेमके वर्णन करण्यासाठी आम्ही 'होऊन आहेत' असे क्रियापदाचे एक आगळे रूप सिद्ध केले आहे. मागे पुष्कळ विनोदी लेखन केलेले पु. ल. अलिकडे विनोदी फारसे लिहित नाहीत. वेगवेगळ्या समित्याची कामे आणि पत्र व प्रस्तावनालेखन. यांच्या व्यापातून विनोदी लेखन करायला त्याना पूर्वीसारखी उसत मिळत नसावी. पण म्हणून काय झाले? लिहित नसले तरी ते विनोदी लेखक आहेतच. त्यामुळे येत्या नोव्हेंबरमध्ये इचलकरजी येथे होणाऱ्या सुवर्णमहोत्सवी मराठी साहित्य समेलनाचे सुवर्णाध्यक्ष म्हणून पु ल. ची रीतसर निवड झाली आहे. त्यावद्दल त्याचे मनपूर्वक अभिनदन करतानासुद्धा, मराठी विनोदी साहित्यात त्याचे नेमके स्थान काय, असा प्राध्यापकी प्रश्न आम्हाला उपस्थित करावासा वाटतो.

या प्रश्नाचे जे उत्तर आम्हाला सुचते, त्याने पु ल. चे भाईवद चाहते आमच्यावर रुष्ट होतील. पण आमचे मत कोणाच्या रुष्टीतुष्टीचा थोडाच विचार करते? आमच्या मते, पुलवत विनोदात श्रीपाद कृष्ण कोल्हटकराचे वेहेतरीन बुद्धिवैभव नाही, बाळकरामाचा करामती कल्पनाविलास नाही, आचार्य अत्र्याची सुभग सर्वंकषता नाही; चिं. वि जोशाची विलोल विशुद्धता नाही! उरलेल्या मराठी विनोदकारांपैकी कोणाचे काय पु लं. च्या विनोदात नाही हे मी सहज सागू शकेन; पण विस्तारभयास्तव ते टाळतो (आणि साहित्यसमेलनाध्यक्षाचा सुवर्णमान राखतो.) पु ल. देशपाड्याच्या विनोदात असे कोणाचे काही नमूनही या महाराष्ट्रदेशी ते एक थोर विनोदी लेखक म्हणून ख्याती पावले त्यामुळे त्याच्या विनोदी लेखनात विनोद असावा की काय असा सशय माझ्या मनात येऊ लागला आहे. असो.

पु ल. देशपाडे नुसते लेखक नाहीत; ते नट आणि निर्माते सुद्धा आहेत. 'बटाट्याची चाळ', 'असा मी असामी', 'हसवण्याचा माझा धदा' हे त्याचे एकपात्री प्रयोग महाराष्ट्राला आवडले. महाराष्ट्राची तशी थोडीशी कमालच आहे. अन्य मडळीचे, त्याच्या मते पु. ल. च्या एकपात्री प्रयोगाइतकेच दर्जेदार, एकपात्री प्रयोग फारसे चालले नाहीत. क्वचित चालले तेव्हा पु. ल. च्या चतकोर एवढेसुद्धा पैसे मिळाले नाहीत 'बटाट्याची चाळ' आणि 'असा मी असामी'चे सोडा; ते अभिनयनिष्ठ एकपात्री प्रयोग होते, पण 'हसवण्याचा माझा धदा' म्हणजे एका जागी उभे राहून केलेले कथावाचन. आणि त्या एकपात्री धद्यात हा हसव्या माणूस प्रयोगामागे म्हणे नगद हज्जार रुपये खिशात टाकतो. वस्तुत: यापेक्षा वसत बापट, विंदा करदीकर, मगेश पाडगावकर याच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम कितीतरी अधिक नाट्यपूर्ण, अभिनयखचित आणि रसरगीत असतो; पण त्यासाठी तीनचारशेपेक्षा अधिक मागायला त्याचीसुद्धा जीभ धजत नाही, असे म्हणतात. अर्थात पु. ल. देशपाडे आणि ही कवीमडळी याच्यात मूलभूत फरक आहे: कवी मडळी काव्यप्रेमापोटी काव्यवाचन करतात. तेथे मोल पैशाला नसते, पु. ल. देशपाडे पैसे घेऊन हास्य विकतात– तेथे पैशालाच मोल असते

पैशाचे मोल या लेखकाने भले जाणले आहे. गेल्या चौदापधरा वर्षात पु. ल. नी दुसऱ्याला देण्याइतके बख्खळ पैसे कमावले. पु. ल. पैसेवाले झाल्यानतर त्याच्यावद्दल आणि त्याच्या साहित्यावद्दल चागले बोलणे मला अवघड होऊ लागले. पैसा आणि चांगुलपणा एकत्र नादत नाहीत अशी आमच्या वडिलाची शिकवण आहे त्यात पुन्हा पु. ल. देशपांडे हे टवाळ विनोदी लेखक. तसले थिल्लर आणि थिटेथोटके साहित्य माझ्या प्रौढ आणि गभीर प्रकृतीला मानवत नाही. मी तर विनोदाला पूर्ण साहित्याचा दर्जा आहे, असेही मानत नाही!

अजाण लोकाना हे कळणार नाही. हास्य ही जीवनातली फार मोलाची गोष्ट आहे, असे ते मानतात. त्याच्यामुळेच पु. ल. देशपाड्यासारख्याचा हसवण्याचा धदा, या पोक्त, गभीर आणि जबाबदार महाराष्ट्रातदेखील, बरा तेजीत चालू शकतो. ◻

## गंगोगा पुन्हा चालू झाले

आम्ही लहान होतो तेव्हाच गगाधर गोपाळ गाडगीळ मोठे लेखक झाले होते. आता यथाकाल आम्ही मोठे झालो तरी गगाधर गोपाळ गाडगीळ आपले मोठेच लेखक होऊन राहिले आहेत. सगळ्या लेखकाचे असे होत नाही. वाचक मोठे झाले की त्याच्या लेखी, एकेकाळचे मोठे लेखक लहानवाणे होऊन जातात. गगाधर गोपाळ गाडगिळाचे तसे झाले नाही.

गेली पंचवीस-तीस वर्षे, गोपाळराव गाडगिळाचा हा गगाधर, टीकाकार ज्याला लक्षणीय आणि दर्जेदार म्हणतात असे लेखन करत आला आहे. व्यवसायाने आधी प्राध्यापक आणि पुढे प्राचार्य झाल्यामुळेच इतके हे सारे जमू शकले हे उघड आहे. पण तरी आपले लिहिणे आपल्यालाच लिहावे लागते ना. ग. गो. गाडगिळानी सुतार पक्षाच्या चिकाटीने लेखन केले. (बहुधा यामुळेच, त्याचे लेखन 'टोकदार' आहे,

असे म्हटले गेले असावे.) दीडदोनशे नव्या कथा लिहून त्यांनी नवकथेला आत्मविश्वास मिळवून दिला; 'खरं सांगायचं म्हणजे' आणि 'बंडू' अशी दोन अफलातून चविष्ट पुस्तके लिहिली; एकांकिका-नाटकात किरकोळ खुडबुड करून पाहिली (त्यांचे 'ज्योत्स्ना आणि ज्योती' हे एक चांगले बऱ्यापैकी नाटक आहे, असे आमचे स्पष्ट व निखालस मत आहे); 'लिलीचे फूल' आणि 'दुर्दम्य' (खंड १ व २) या आपापल्यापरीने अद्वितीय कादंबऱ्या सिद्ध केल्या; 'साहित्याचे मानदंड' व 'खडक आणि पाणी' या टीकालेखसंग्रहातून चष्मेवाल्या मराठी अभ्यासकाला चार शहाणपणाच्या गोष्टी शिकविल्या; लहान मुलांची थोडी रिझवणुक करून प्रभूशी नाते जोडले; अर्थशास्त्रावर विद्यार्थीप्रिय पाठ्यपुस्तके रचली; 'द इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' इत्यादी जगद्विख्यात नियतकालिकातून चक्क इंग्रजीतून स्फुटलेखन केले; 'मौज', 'ललित', 'महाराष्ट्र टाईम्स' इत्यादी बृहन्महाराष्ट्रख्यात साप्ताहिक-दैनिकातून पत्रे लिहिली. तात्पर्य, गंगाधर गोपाळ गाडगीळ लिहित लिहित मोठे झाले आणि मोठे होता होता लिहित राहिले.

'दुर्दम्य' (खंड १ व २) ही सुपारी खाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या जीवनावरील मराठीतली आदर्श चरित्रात्मक कादंबरी गं. गो. गाडगिळांनी अलिकडेच लिहिली. त्यापूर्वी काही वर्षे त्यांचे लेखन जणु थांबले होते. त्यांचे नाव दिवाळी अंकातदेखील दिसायचे नाही. आमच्या काही साक्षात्कारी टीकाकारमित्रांनी 'गंगाधर गाडगीळ संपले बरं का' असे आम्हाला खासगीत सांगूनही टाकले होते. त्यांच्या स्वरात खत्रुड खुशी लपली आहे काय, अशी शंका तेव्हा आम्हाला आली होती. पण आमच्या धीरगंभीर स्वभावाला अनुसरून आम्ही काही बोललो नाही. गाडगिळांच्या एका चाहत्याने आम्हाला म्हटले : 'कोण म्हणतो गाडगीळ संपले ? गाडगिळांसारखा लेखक असा संपत नसतो, राव. तो थांबतो. आपण होऊन थांबतो. गाडगीळ संपले नाहीत; थांबले. शब्द काळजीपूर्वक आणि जपून वापरले पाहिजेत आपल्यासारख्यांनी.' याही वेळी आम्ही काही बोललो नाही. पण आम्हाला वाईट वाटल्यावाचून कसे राहील ? कोणी कधी संपू नये, थांबू नये, असेच माझ्या मनी (मानसी) असते. पण आम्ही बोलत मात्र नाही. असो.

पुढे 'दुर्दम्य' खंडशः बाजारात आले. आम्ही ते अखंडशः वाचले. त्याचे खंडशः कौतुक केले. (कारण आम्ही अखंडशः कौतुक कोणाचेच करत नाही. तसे करणारा माणूस म्हणे पुढील जन्मी ग्लुकोजचे बिस्किट चहात बुडवून खातो ! नकोच ते.) साहित्यिकात आणि साहित्याळलेल्या वाचकात बाळ गंगाधर टिळक आणि गंगाधर गोपाळ गाडगीळ यांच्या चारित्रिक विशेषांची चर्चा झाली. आम्हाला मात्र, संपले-थांबलेले गं. गो गाडगीळ पुन्हा चालू झाले, यात सारे पावले होते. आता काही काळ तरी ते भसाभसा लिहितील, असा काहींचा अंदाज होता.

पण कसचे काय नि कसचे काय. गाडगिळांनी पेन बंद करून बुशशर्टाच्या खिशाला लावून टाकले आणि आपल्याच डोळ्यांचे कोपरे आपल्याच हातबोटांनी कुरवाळण्याच्या उद्योगात ते गढून गेले. 'गाडगीळ संपले', 'गाडगीळ थांबले' अशी भाकिते पुन्हा आमच्या कानी पडू लागली. पुन्हाही आम्ही काही बोललो नाही. पण आम्हाला वाईट वाटल्यावाचून कसे राहील ?

आणि एके दिवशी 'सोबत' हे सदरंदाज साप्ताहिक चाळत असता अचानक आम्हाला 'फिरक्या' या नव्या सदराचे दर्शन झाले. सदराचे लेखक होते : गंगाधर गोपाळ गाडगीळ. नावावरून या सदरात काहीतरी खमंग, खवचट, खरमरीत वाचायला मिळत राहील असा आमचा कयास आहे. असे लिहिण्याची गं. गो. गाडगिळांची क्षमता सर्वांना ठाऊक आहे. असे लिहू शकणाऱ्याबद्दल मला स्वतःला मोठाच आदर वाटतो. कारण प्रयत्न करूनही तसे लिहिणे मला जमत नाही. माझे लिहिणे आपले सौम्य, सात्त्विक, सीधेसाधेच राहाते.

गं. गो. गाडगीळ गेली कित्येक वर्षे लिहित आले असले तरी असे साप्ताहिक सदर लिहायची संधी त्यांना बहुधा प्रथमच लाभली असावी. अर्थात गाडगिळांनी कोणतीही गोष्ट प्रथम केली तरी ती सराईतासारखी असते ! त्यामुळेच आमचे फसकफदे झालेना. नाहीतर सदरबाजीतल्या वडिलकीच्या जोरावर, आमच्या लहानपणीच्या या मोठ्या लेखकाला आशीर्वादपर उत्तेजन देण्याची संधी आम्हाला सहज साधता आली असती.

—अनंतराव



# सायप्रस
## संघर्षाचे आंतरराष्ट्रीय धागेदोरे
वा. दा. रानडे

सायप्रसमधील लष्करी उठाव म्हणजे लष्करशाहीने लोकशाहीवर केलेला आघात आहे हा केवळ लोकशाहीवरच नव्हे तर सायप्रसच्या स्वातंत्र्यावर आणि सार्वभौमत्वावर घाला आहे. कारण उठाव देशातल्या लष्करी अधिकाऱ्यानी स्वत.च्या बळावर केलेला नसून ग्रीसच्या लष्करी अधिकाऱ्यानी तो घडवून आणला आहे. सायप्रसच्या नॅशनल गार्डला, लष्करी शिक्षण देण्यासाठी ग्रीसचे ६५० लष्करी अधिकारी सायप्रसमध्ये पाठविण्यात आले होते. त्यानी हा उठाव घडवून आणला. त्याला प्रेरणा व चिथावणी ग्रीसच्या लष्करी राजवटीची होती सायप्रस ग्रीसला जोडावे या मागणीसाठी हा उठाव झाला व अध्यक्ष मकारिओस याचा त्यास विरोध असल्याने त्याना पदच्युत करण्यात आले. मकारिओस याना ठार करण्याचाच बडखोराचा विचार होता. अध्यक्षीय निवासस्थानावर त्यानी हल्ला केला आणि त्यात मकारिकोस ठार झाले अशी बातमीही प्रसिद्ध केली मकारिओस याच्या बाजूच्या लोकाचे मनोधैर्य खचावे हाही त्यामागे उद्देश असावा. पण सुदैवाने मकारिओस हल्ल्यातून बचावले.

सायप्रस ग्रीसला जोडण्याची मागणी स्वातंत्र्य लढयाच्या काळापासून करण्यात येत आहे. सायप्रसमध्ये ग्रीक ८० टक्के व तुर्क २० टक्के आहेत हे लक्षात घेता ग्रीसने सायप्रसवर हक्क सागितला आणि सायप्रसमधील ग्रीकानाही ग्रीसला मिळावेसे वाटत असेल तर कोठे चुकले ? असा प्रश्न कोणाच्याही मनात येणे स्वाभाविक आहे. बहुसख्य लोकाची तशी इच्छा असेल तर ती कोणी थोपवून धरू शकणार नाही. पण अल्पसख्य तुर्कांमुळे हा प्रश्न गुतागुतीचा बनला. सायप्रस ग्रीकला जोडले गेल्यास आपले हक्क व हितसबध सुरक्षित राहातील की नाही अशी भीती तुर्कांना वाटते म्हणून या मागणीस त्याचा विरोध आहे. ग्रीक त्यांचे समाधान करू शकलेले नाहीत. आपल्याकडच्या हिंदु-मुसलमान प्रश्नासारखेच या प्रश्नाचे काहीसे स्वरूप आहे. सायप्रसचा *स्वातंत्र्य लढा मुख्यत* ग्रीकानीच केला. तुर्क त्यात फारसे सहभागी झाले नाहीत. ग्रीक व तुर्क एकत्र येऊन त्याची राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकली नाही. सायप्रस ग्रीसला जोडावे या मागणीमागे सास्कृतिक व भावनात्मक एकात्मता होती. स्वत मकारिओसही सुरुवातीला त्या मताचे होते पण तुर्कांच्या समाधानासाठी त्यानी तो आग्रह सोडला. सायप्रस १९६० मध्ये स्वतत्र झाले. ब्रिटन ग्रीस व तुर्कस्तान यानी त्याच्या स्वातंत्र्याची हमी दिली तरीही सायप्रस ग्रीसला जोडावे या मागणीसाठी एकेका सघटनेचे आंदोलन चालूच राहिले गेल्या काही महिन्यात या सघटनेने ग्रीक लष्करी अधिकाऱ्याशी सधान बाधले व त्यातून हा लष्करी उठाव घडून आला. आणि अवघ्या साडेसहा लाख वस्तीचे व ३५७२ चौरस मैल क्षेत्रफळाचे हे पूर्व भूमध्य समुद्रातील छोटेसे बेट सघर्ष क्षेत्र बनले. ग्रीस व तुर्कस्तान या दोन्ही राष्ट्रानी लष्कराची जमवाजमव केली. तुर्क पंतप्रधानांनी सयुक्त हस्तक्षेपाबाबत ब्रिटनशी बोलणी केली. या युद्ध तयारी बरोबरच तडजोडीचेही प्रयत्न चालू होते. ग्रीसने आपले लष्करी अधिकारी सायप्रसमधून काढून घ्यावेत असे दडपण इग्लड-अमेरिकेने ग्रीसवर आणले. ग्रीसने अखेर हे अधिकारी परत बोलावण्याचे मान्य केले असल्याच्या बातम्या आहेत पण तेवढयाने प्रश्न सुटत नाही. सायप्रसवर आर्च बिशप मकारिओस यांची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाली पाहिजे. यूनो व बडी राष्ट्रे या बाबतीत काय करतात हा महत्त्वाचा प्रश्न आहे.


यूनोच्या ठरावाना बडया राष्ट्राचा पाठिंबा नसेल आणि बडया राष्ट्रांचे एकमत नसेल तर या ठरावाची यशस्वी अमलबजावणी होत नाही असा आतापर्यंतचा अनुभव आहे. रशिया अमेरिकेचे एकमत झाल्यावरच व्हिएटनाम आणि अरब इस्राइल सघर्षाच्या प्रश्नात तडजोड झाली. सायप्रसबाबत रशिया अमेरिकेच्या भूमिका जुळत्या आहेत का ? रशियाने लष्करी उठावाचा निषेध केला आणि यूनो सनदेचा हा भग आहे असे म्हटले. अमेरिकेने एवढया तीव्र शब्दात आपली प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही. सायप्रसचे भूमध्य समुद्रातील मोक्याचे स्थान लक्षात घेता तेथे आपल्याला अनुकूल राजवट असावी असे या दोन्ही बडया राष्ट्राना आपल्या हितसबधाच्या दृष्टीने वाटत असेल तर ते स्वाभाविक आहे. अध्यक्ष मकारिओस याचे परराष्ट्र धोरण तटस्थतेचे आहे हे छोटेसे राष्ट्र आपली तटस्थता कितपत समर्थपणे टिकवू शकेल ? तेथील परिस्थितीचा फायदा घेऊन रशिया तेथे आपला प्रभाव वाढवील असे अमेरिकेला वाटते. सायप्रसवर सध्या ब्रिटिशाचे लष्करी तळ आहेत. स्वातंत्र्याच्या कराराचा एक भाग म्हणून या तळाना मकारिओस यानी मान्यता दिली. पण हे तळ काढून घेण्याची मागणी मकारिओस करतील असेही अमेरिकेस वाटत होते. तेव्हा तटस्थ धोरणाच्या मकारिओसपेक्षा ठामपणे अमेरिकेच्या बाजूची राजवट सायप्रसमध्ये आली तर अमेरिकेला पाहिजेच होती. स्वत: काही करावे न लागता ग्रीसच्या हातून हे परस्पर होत असेल तर अधिकच चागले अशी अमेरिकेची भूमिका आहे.

आपणास ज्याला पाठिंबा द्यावयाचा नसेल त्याला कम्युनिस्ट किंवा त्याचा पाठीराखा

पृष्ठ २१ वर

# रोझेस इन डिसेंबर

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : सहा



महंमद करीम छगला
यांच्या
रोझेस इन डिसेंबर
या आत्मचरित्राचा
धावता परिचय

जेव्हा जी. एल. नंदांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला त्यावेळी मंत्रिमंडळाची पुनर्रचना करण्यात आली. इंदिराजींनी तेव्हा मला परराष्ट्रखात्याच्या मंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारण्यास सांगितलं. परराष्ट्रखात्यासारख्या एका खात्याची धुरा माझ्यावर सोपवल्याने साहाजिकच मी इंदिराजींचे आभार मानले.

धोरणाच्या बाबतीत सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पाकिस्तान-बरोबरचे संबंध. माझ्या नेमणुकीनंतर पाकिस्तानविषयी कठोर धोरण स्वीकारणारा मंत्री म्हणून माझं वर्णन करण्यात येऊ लागलं. त्यानंतर मला असंही कळलं की, लालबहादूरजींना मला परराष्ट्र मंत्री नेमायचं होतं. पण पाकिस्तानविषयी असलेल्या माझ्या दृष्टि-कोनामुळे काही वृत्तपत्र गटांनी व काही लोकांनी लालबहादूर यांना तसं न करण्याबाबत सल्ला दिला. जर मी परराष्ट्रमंत्री झालो असतो तर, त्यांना असं वाटत असावं की, पाकिस्तानबरोबरच्या आपल्या संबंधात बाध आला असता.

पाकिस्तानविषयीचं माझं धोरण कठोर नाही पण कणखर मात्र जरूर आहे. सामर्थ्यवान भूमिकेतूनच आपण पाकिस्तानशी वाटा-घाटी कराव्यात असं मला नेहमीच वाटत आलं आहे. पाकिस्तानच्या भारताविषयीच्या प्रतिक्रिया अजमावणे हे तसं अगदी सोपं काम. कारण कुठल्याही भारतीय भूमिकेला विरोध करणे हीच नेहमी पाकिस्तानची प्रतिक्रिया असते. भारतविद्वेष हेच मुळी पाकिस्तानचे धोरण आहे. आपली दोन राष्ट्रं ज्या कल्पनेवरती व भूमिकेवरती उभी आहेत, त्या भूमिका मुळातच अत्यंत विभिन्न स्वरुपाच्या आहेत. हिंदू व मुसलमान एकाच राज्यात शांततेने नांदणे अशक्यच अशी पाकिस्तानची आजवर भूमिका राहिली आहे.

भारतविद्वेषावर पाकिस्तानी राज्य उभारलं आहे. भारताचा पाकिस्तानवर सतत आक्रमण करण्याचा विचार आहे, असा सतत प्रचार पाकिस्तानमध्ये चाललेला असतो. तरीही युद्धवंदी अथवा

अनाक्रमणाच्या करारावर पाकिस्तान कधीच सही करीत नाही. एवढ असूनही पाकिस्तानवरोबर सबध सुधारावेत हा दृष्टिकोन घेऊन आपण सतत त्या दिशेने झटत असतो. पण त्याच वेळी आपण पाकिस्तानलाही जाणीव करून दिली पाहिजे की, आम्ही कणखरपणे पाय रोवून उभे आहोत. 'काश्मीर' हा वादाचा प्रश्नच होऊ शकत नाही याची आपण पाकिस्तानला खबीरपणे जाणीव करून दिली पाहिजे.

मी परराष्ट्रमत्री झाल्यावर तावडतोव मी माझ्या अधिकाऱ्याना पाकिस्तानी राजदूत श्री. अझीझ अहमद याच्याशी सपर्क साधायला सागितले. व्यापार उदीम अथवा विमान वाहतूक वा दळणवळण यासारख्या प्रश्नावर आपण कुठ मतैक्य साधू शकतो का, याचा अधिकाऱ्याना, श्री. अहमद याच्यावरोबर चर्चा करून तपास करायला सागितलं. अझीझ अहमद यानी सागितल की, पहिला प्रश्न काश्मीर, त्यानतर इतर सर्व. खूप मोठ्या चर्चेनतर श्री. अहमद फक्त 'टेलेकम्युनिकेशन्स'वर चर्चा करण्यास तयार झाले.

त्या वेळचे पाकचे परराष्ट्रमत्री श्री. पीरझादा यानाही मी भेटायचा यत्न केला. जिनिव्हाला जेव्हा कच्छ ट्रिब्युनलच्या सुनावणी करता गेलो होतो तेव्हा तेथे माझी व त्याची जवळ जवळ भेट ठरलीच होती पण अझीझ अहमद यानी त्याला सुरुग लावला.

## ताश्कंद करार धुडकावला

त्यानतर पश्चिम आशिया सघर्षाच्या वेळी जेव्हा मी न्यूयॉर्कला गेलो होतो तेव्हा त्याची भेट घेण्याचा पुन्हा यत्न केला व त्याना जेवणाच निमत्रण दिल. त्यावर त्यानी तीन अटी घातल्या, मी जरा चक्रावलोच. मी त्याना जेवणाच निमत्रण देतोय व महाशय अटी घालताहेत! त्यानी अटी सागितल्या त्या अशा : एक म्हणजे खान्याच्या वेळी फक्त आम्ही दोघेच उपस्थित असू. दुसरं म्हणजे आमच्यातल बोलण पूर्णपणे गुप्त राहील व तिसरी अट म्हणजे मी त्यांच्याकडे परत जेवायच आमत्रण स्वीकारल पाहिजे. या तीन अटी ऐकून मी म्हणालो, जर प्रत्येक वेळी पाकिस्तानचे प्रश्न असे सोडवता येणे शक्य असेल तर आपले सबध चुटकीसरशी सुधारतील. मी पहिल्या दोन अटी पाळल्या, पण त्यानतर तेही परराष्ट्रमत्री म्हणून फार काळ राहू शकले नाहीत. त्यामुळे तिसरी अट तशीच राहिली आहे. आमच्यात काय बोलण झालं हे मात्र मी त्या दुसऱ्या वटीमुळे सागू शकत नाही.

आपण ताश्कद करार ज्या भावनेन पाळला त्या भावनेन पाकिस्तानने काही तो करार पाळला नाही.

मला वाटतं, पाकिस्तानने ताश्कद कराराचा कधी गभीरपणे विचारच केला नाही. करारावरती असलेल्या सहीची शाई वाळताच पाकिस्तानने तो करार जवळ जवळ धुडकावून लावला. पाकिस्तानच्या चागुलपणावर विश्वास न ठेवण अथवा पाकिस्तानी वचनाला फार किंमत न देणं हेच मला वाटत ताश्कद कराराच तात्पर्य.

त्या वेळी अमेरिका पाकिस्तानला धडाक्याने शस्त्रास्त्र पुरवठा करीत असल्याने लोकसभेत अनेक वेळेला त्या प्रश्नावरून गभीर वातावरण निर्माण होई. अमेरिकेचे पाकिस्तानला शस्त्रपुरवठ्यामागील हेतू मला कधीच समजले नाहीत. कुठल्याही दृष्टिकोनातून त्याकडे जरी बघितले तरी त्या पाठी काही सूत्रबद्ध विचार असू शकेल अस वाटतच नाही. भारतीय उपखडात जर शातता नादायची असेल तर भारत सामर्थ्यवान असलाच पाहिजे. बरं, भारत व पाकिस्तान यामध्ये काही सतुलन असूच शकणार नाही. कारण लोकसख्या घ्या, प्रदेश घ्या, कुठल्याही दृष्टिकोनातून भारत पाकिस्तानपेक्षा बलवानच आहे व बलवानच रहाणार. त्याच वेळी अमेरिका भारताला आर्थिक मदत देते. ज्या वेळी अमेरिका पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करते त्या वेळी हे साहाजिकच आहे की, भारत पण शस्त्रास्त्रावर पैसे खर्च करणार म्हणजे परत अमेरिकन मदतीचा मोठा भाग शस्त्रास्त्राकरता खर्च होणार. मग त्या आर्थिक मदतीचा उपयोग काय? भारत पाकिस्तानमध्ये अशी स्पर्धा लावून अमेरिका नक्की काय साधते, हे मला कधी कळलच नाही. त्यापाठी काही तर्कसगती असू शकेल, हे या वरील विवेचनावरून पटतच नाही.

अमेरिकेच्या पाकिस्तानला शस्त्र पुरवण्याच्या धोरणाविरुद्ध अमेरिकन सरकारकडे मी अनेक वेळेला तीव्र निषेध नोदवले आहेत. पण त्याचा कधीच उपयोग झाला नाही पाकिस्तानलाही अनेक वेळा शस्त्रमर्यादा कराराविषयी सूचीत करून पाहिले आहे. पण पाकिस्तानच्या युद्धपिपासू धोरणावर त्याचा कधीच काही परिणाम झाला नाही.

चीन बाबत माझ धोरण अस होत, की आपल्या या शेजाऱ्यावरोबरची कोंडी जास्त काळ राहू नये. ते आपल्या हिताच नाही. पण त्यावर अनेकवेळेला टीका व्हायची. पाकिस्तानबरोबरचे आमचे मतभेद हे अधिक मूलगामी व तात्त्विक होते चीनबावत तस नव्हत. पाकिस्तानपेक्षा चीन बरोबरचे आपले सबध सुधारण्याची चिन्हे मला नेहमीच अधिक आशादायक वाटत आली आहेत.

चीनने आपल्या पेकिंगमधील भारतीय वकिलातीतल्या लोकाना जेव्हा अपमानास्पद वागणूक दिली, मारहाण केली त्यावेळी तर लोकसभेत सदस्य अत्यत सतप्त झाले व तावडतोब त्यानी आपण आपले राजनैतिक सबध बरखास्त करावेत म्हणून मागणी केली. मी त्याला अर्थातच मान्यता दिली नाही. कारण त्या योगे आपली चीनमधली एकुलती एक 'खिडकी' बद झाली असती व परत जर कधी सबध प्रस्थापित करावेसे वाटले तर तेव्हा ते फार कठीण गेल असत. त्यामुळे मी वरील मागणीला मुळीच पाठिंबा दिला नाही. पण त्याचप्रमाणे नमत मात्र घेतल नाही. इथल्या चिनी वकिलातीतल्या लोकांना त्याच्या वकिलातीत अक्षरश: कोंडून ठेवण्यात आलं.

मी परराष्ट्रमत्री झाल्यावर पहिल्यादा परदेशाला भेट दिली ती इडोनेशियाला. आपण सारेच जर आर्थिकदृष्ट्या बलवान झालो तर चीनचे मनसुत्रे काही फावणार नाहीत या विषयी मला खात्री होती. त्यामुळे इडोनेशिया वगैरे सारख्या देशावरोबर आर्थिक, व्यापारी, करार करून जेवढे म्हणून दोन्ही देशांना बलवान होता येईल तेवढ व्हायचे, या विचाराचा पाठपुरावा करण्यासाठीच मी इडोनेशियाला भेट दिली.

त्यावेळी इडोनेशियाचे परराष्ट्रमत्री होते श्री. आदम मलीक. त्याना इडोनेशियाचे भारतविरोधी धोरण बदलायची मनापासून

इच्छा होती. त्याकरिता पाकिस्तान बरोबरचे त्यावेळचे शस्त्रकरार रद्द करायची सुद्धा त्याची तयारी होती.

चीनला पायबद घालण्याच्या विचारावर आम्ही दोघेही सहमत झालो. आमच भाडण श्री सुकार्नो याच्याशी होत. मलेशिया विरोध व चीनशी जवळीक या त्याच्या धोरणाला आमचा विरोध होता. इडोनेशियाशी नेहमीच मैत्रीपूर्ण सबध असावेत अस भारताला वाटत आल आहे. पण सुर्कोना अगदी भारताच्या विरुद्ध गेले व पाकिस्तानच्या काश्मीर दृष्टिकोनाला त्यानी पाठिंबा दिला. सुकार्नो त्यावेळी नाममात्र राष्ट्राध्यक्ष होते. मी व मलीक ज्या दिवशी त्याना भेटायला गेलो त्या दिवशीच्याच वर्तमानपत्रात मलीक यानी सुकार्नोवर कडाडून टीका करणारा लेख लिहिला होता. आल्यावर सुकार्नोनी पहिला प्रश्न विचारला, काय तुम्ही आमच्या परराष्ट्रमत्र्याचा लेख वाचलात का ? मला काही कळेना मग त्यानीच सदर्भ स्पष्ट केला व पुढे म्हणाले, त्यावर काही विश्वास ठेवू नका. त्यातलं एक अक्षर खर नाही. साहाजीकच हा विषय त्यानी काढायला नको होता. त्यानतर मलीक व सुकार्नो दोघानाही थोडस विचित्रच वाटल. त्यानतर सुकार्नोनी मला भारतीय सस्कृती, टागोर वगैरे गोष्टीवरती एक लेक्चर सुनावल.

सुकार्नोनी त्याच्या देशाकरता खूपस काही केलं होत. देशाला त्यानी वर आणलं होत पण स्वत.च्या चैनीच्या सवयीमुळे व त्या नुसार बनलेल्या त्याच्या दृष्टिकोनामुळे त्यानी देश परत रसातळाला नेला, आर्थिक हलाखीत आणल, जवळ जवळ इडोनेशियाला त्यानी नादारच केलं म्हणा ना.

परत येताना बर्मामध्ये मी जनरल ने वीन याची भेट घेतली. परदेशी सत्ताना स्वत च्या देशात घुसू देण्याने काय परिणाम होतात हे त्याना चागल ठाऊक होत. त्यामुळे ते त्यापासून फार जागरूक होते. जवळ जवळ सपूर्ण तटस्थता हेच त्याच धोरण. बर्मामध्ये आमच अनेक प्रश्नावरती एकमत झाल व बर्मा व आपल्यामध्ये एकोपा निर्माण झाल्याच्या समाधानाने मी परत आलो. बर्माच्या सहकार्यामुळे मिझो घुसखोराना चागला पायबद बसला.

माझ्या सिंगापूर व मलेशिआच्या भेटीसुद्धा मला चागल्याच आठवतात. या दोन्ही देशानी नेहमीच भारताला अनुकूल दृष्टिकोण घेतले होते. मलेशिया व सिंगापूरमध्ये अनेक भारतीय होते. त्यातले काही तर अत्यत उच्चपदावरही होते. पण या दोन देशाच्या पतप्रधानाच मात्र एकमेकाशी मुळीच जमत नसे. एक चिनी होते तर दुसरे मलेशिन. एक नवमतवादी तर दुसरा परपरावादी. सिंगापूरचे पतप्रधान 'ली क्वाथ यू' अत्यत तल्लख बुद्धिमत्तेचे गृहस्थ होते. अनेक लोकाप्रमाणेच मीही त्याच्या व्यक्तिमत्वामुळे प्रभावीत झालो. त्याउलट टुकु अब्दुल रहमान धीम्या स्वभावाचे, विचारी व प्रागतिक होते. त्यादोघांच एकमेकाशी मुळीच जमत नसे. लीना वाटायच की टुकू म्हणजे कल्पनाशक्ती नसलेले पतप्रधान. तर टुकुच्यामते ली म्हणजे वास्तवाचा अदाज नसणारा पण उगीचच झेपावणारा थोडासा बालीश असा नेता होता.

एकदा टुकु अब्दुल रहमान यानी गुरुवारी रात्री मला खान्याचं खास आमत्रण दिल. अत्यत खुल्या व उदार मनाने त्यानी माझं आतिथ्य केल. दुसऱ्या दिवशी शुक्रवार होता म्हणून टुकु म्हणाले 'उद्या आपण दोघे मिळून मशिदीत नमाझाकरीता जाऊ.' मी काही ढोंगी नाही. असल्या गोष्टीवर काही माझा विश्वास नाही. त्यामुळे मी सागितले की 'उद्या मला त्यावेळेला थोडस काम आहे' तर टुकू म्हणाले, की पाहिजे तर आपला वेळ आपल्या दोघांच्या सोयीनुसार ठरवू मी परत त्याना काहीतरी कारण सागितल व त्याच्या सहवासाचा लाभ घेऊ शकत नसल्याबद्दल खेद व्यक्त केला. टुकुनाही कळल, की कुठल्यातरी कारणाकरता मला त्यांच्याबरोबर जायच नव्हत. पुढे कधीतरी जपानचे आपले राजदूत श्री. बानर्जी यानी मला सागितले, की त्याना टुकुनी सागितले म्हणे, की छगला शिया असल्याने माझ्यासारख्या सुन्नी मुसलमानाबरोबर मशिदीत जाण त्याना बहुधा प्रशस्त वाटत नसाव. त्याना जर खरं कारण कळल असत तर त्याची काय प्रतिक्रिया झाली असती कोणास ठाऊक !

दुसऱ्यादा एकदा मी त्याच्याकडे सकाळी ७ वाजता गेलो. त्यानी मला कॉफी दिली व म्हणाले की 'मी रात्री दोनवाजेपर्यंत पोकर खेळत होतो. माझ्या आयुष्याच तत्वज्ञान काय आहे ठाऊक आहे ? देवाच जे काही देण असेल ते मी देऊन टाकतो. देशाच जे ऋण आहे तेही मी यथाशक्ती फेडतो व उरलेला जो वेळ आहे तो माझ्यावर खर्च करतो.' राजकारण्याच्या बाबतीत हे किती खर आहे !

## माझी इराण भेट

माझी इराण भेट जरा उच्च पातळीवरील होती. भारतपाक सघर्षात इराणने जी भूमिका घेतली होती त्याविषयी भारतात लोक नाखूश झाले होते. पण तेथे गेलो तेव्हा अस का असाव याविषयी मला थोडस आश्चर्यच वाटल. तिथले लोक अत्यत प्रेमळ होते आणि भारत व इराण यामधल्या मैत्रीविषयी ते पूर्णपणे आश्वस्त होते. आपल्याविषयी कुठे थोडासाही दुरावा मला इराणमध्ये आढळला नाही. पण शेवटी राजकारण ते वेगळच असत. काहीवेळा चुकीच्या दृष्टिकोनातून नेते काही भूमिका ठरवतात.

इराणच्या शहानी मला जेवणाच खास निमत्रण दिल त्याचा जावई हाच परराष्ट्रमत्री होता. मी अमेरिकेत व इग्लडमध्ये असताना तेही राजदूत म्हणून त्याच देशात होते. त्यामुळे माझी व त्याची चागलीच मैत्री होती. त्या तास दीड तासात इराणच्या शहानी जागतिक राजकारणाची जणू मला सफरच घडवली. अत्यत सुसस्कृत गृहस्थ ! त्याच्या जेवणाच्यावेळी सर्व्ह केलेली दारू ही अत्युत्तम होती व जेवणही अगदी लक्षात रहाण्यासारख होत. त्यावेळी ते सहज म्हणाले की, त्याच्या दुसऱ्या बायकोने काही भारताला भेट दिली नव्हती. तावडतोब मी त्या दोघानाही भारतभेटीच अमत्रण देऊन टाकल व त्याप्रमाणे ते आलेही.

पाकिस्तानविषयीच्या त्याच्या धोरणावर आम्ही दोघही आडून आडूनच बोलत होतो. त्यानीही त्याचा सरळ उल्लेख टाळला. अर्थात मीही त्याचेच अनुकरण केले. म्हटल दुसऱ्या दिवशी परराष्ट्र मत्र्याच्या बैठकीत हा प्रश्न उपस्थित करू.

दुसऱ्या दिवशी मी परराष्ट्रमत्र्याबरोबर ते पाकिस्तानला देत असलेल्या शस्त्रास्त्र मदतीविषयी चर्चा केली. पुढे या चर्चेवरूनच बरेच वादळ माजले. त्यामुळे त्या आमच्या भेटीत नक्की काय झालं ते सागतो. मी, ते पाकिस्तानला करीत असलेल्या शस्त्रास्त्र

पुरवठ्याचा विषय काढला व त्यांना पाकिस्तानला शस्त्रास्त्र मदत बंद करण्याविषयी विनती केली. आणि भारत पाकिस्तान यांच्यात जर सघर्ष उत्पन्न झालाच तर इराण तटस्थ राहील असे आश्वासन मागितले. त्यावर त्यानी या प्रकारच्या सघर्षात, भारताने प्रथम आक्रमण केले नाही तर इराण सपूर्णपणे तटस्थ राहील असे आश्वासन दिले. मीही त्याना सागितले की भारत कधीच प्रथम आक्रमण करणार नाही. हे काही गुप्तस्वरुपाचे बोलणे नव्हते की ते गुप्त रहावे असा उद्देशही नव्हता. त्यामुळे मी भारतात आल्यावर वरील गोष्टी उघडपणे जाहीर केल्या व तेहेरानमध्ये मिळालेले आश्वासन सुद्धा मी जाहीर केले. काही दिवसानी मला आश्चर्याचा धक्काच बसला कारण तेहरानहून एक पत्रक निघाले होते. त्यात त्यांनी मी वर केलेल्या जाहीर विधानाना आक्षेप घेतला होता व पुढे त्यांनी पत्रकाद्वारे सागितले, की वरील प्रकारचे आश्वासन इराण सरकारने मुळीच सुद्धा दिलेले नाही. पार्लमेंटमध्ये एकच खळबळ माजली. माझ्यावर मी देशाला चुकीच्या मार्गाने नेतोय म्हणून आरोप झाले. अगदी नरडीचा घोट घेण्यासाठी पार्लमेंटमध्ये अनेक सदस्य तयार झाले. पण मी जे वरती सागितले होते त्याचाच मी खबीरपणे पाठपुरावा केला. याची आतली सत्यकथा ही आहे, की जेव्हा आयुबखानानी माझी विधान ऐकली तेव्हा ताबडतोब त्यानी इराणच्या शहाना तार केली व इराण सरकारने माझी विधान खोडून टाकावीत म्हणून आग्रह केला. इराणच्या शहानाही आपल्या मित्राला दुखवायच नव्हत त्यामुळेच तेहरानमध्ये तशा प्रकारचे पत्रक निघालं व त्याच्या परराष्ट्रमत्र्यालाच आपली विधाने मागे घ्यावी लागली.

### परराष्ट्रधोरणाचे सूत्र

आता पश्चिम आशियाच्या सघर्षाकडे वळतो. इस्रायलने इजिप्तवर हल्ला करून अत्यत चाणाक्षपणे पवित्रे आखून इजिप्तच्या फौजावर दणदणीत विजय मिळवला. त्यादिवशी मी लोकसभेत आपले पश्चिम आशियाविषयक धोरण विशद केल व त्यावर त्या अर्थाच निवेदन केल. अनेक सदस्य खवळून उठले. ते म्हणाले, की या निवेदनात माझ वैयक्तीक मतच मी माडल आहे. खर तर ते आमच्या मत्रालयानेच तयार केल होत व पोलिटिकल अफेअर्स कमिटीने त्याला मान्यताही दिली होती. पण नाही. सदस्याच म्हणणं होत, की आधळेपणाने आपण पक्षपाती भूमिका घेऊन इजिप्तला फारच पाठिंबा देत आहोत

मी पुढे विशद केल, की इस्रायल हे एक जातीय कल्पनेवर उभारलेल राष्ट्र आहे या उलट इजिप्तचे नासेर धर्मनिरपेक्ष होते. आणि आपला पाठिंबा नासेर याना होता. मुस्लिम फेडरेशनच्या कल्पनेला नासेर यानी मान्यता दिली नव्हती. त्यामुळे त्या जात्यध लोकापासून नासेर याना सदैव दूर ठेवण्यासाठी आपण नासेर यानाच पाठिंबा दिला पाहिजे. नासेर हे अलिप्त देशाच्या सघटनेचे एक प्रमुख शिल्पकार होते. त्याचप्रमाणे अनेक आतरराष्ट्रीय प्रश्नावरती आपल व नासेर याच एकमत होत. त्यात इस्रायलने पहिल्यांदा हल्ला चढवला होता व इजिप्तवर आक्रमण केल होत. अगदी फायद्याच्या दृष्टिकोणातून जरी पाहिल तरी व्यापाराच्या दृष्टीने सुद्धा आपण इजिप्त गटाला मदत करणे आवश्यक होते. पण नाही. माझा या सर्व युक्तीवाद विरोधी पक्षीयांना काही मान्य झाला नाही. किंबहुना आमचे काही काँग्रेसपक्षीय सभासद सुद्धा या धोरणावर नाखूश होते. ते म्हणाले की चीन, पाकिस्तान बरोबरच्या आपल्या सघर्षात इजिप्त तटस्थ होता. आपल्याला नासेर यानी काहीच मदत केली नाही. याप्रमाणे सतत मला विरोधी पक्षीयाच्या हल्ल्याला तोड द्याव लागल. मी मुस्लिम आहे म्हणून मुसलमान देशाचा पाठपुरावा करतो आहे असही काही लोक म्हणाले. इजिप्शिअनलोक मुस्लिम आहेत का हीदन आहेत, या बद्दल मला काहीच सोयरसुतक नव्हत. आपल परराष्ट्रीय धोरण आपल्या देशाच्या हिताचं असाव, फायद्याच असाव या एकाच दृष्टिकोनातून खबीरपणे मी विरोधीपक्षीयांचे हल्ले परतवीत राहिलो

त्यानतर मी युनोच्या अधिवेशनाला हजर राहून कैरोला नासेर याना भेटायला गेलो एक महान मानवतावादी व अपार सहानुभूती असणारा नेता म्हणून मला त्याच दर्शन घडल. सत्तेने त्याच्या विचारशक्तीचा कबजा घेतला नव्हता. राजे फरूक याना पदच्युत करण्यापूर्वी ज्या घरात ते राहात होते तसल्याच प्रकारच्या घरात ते राहात होते. त्यानी स्वत करिता राजवाडा वगैरे बांधला नव्हता. शक्यतेच्या राजकारणावर त्याचा जास्त भर दिसला. उगीचच मोठीमोठी आश्वासने देण्यापासून ते दूर रहात. वास्तवाला ते नेहमीच सामोरे गेले. ते अखड धूम्रपान करायचे पण एका बैठकीतच त्यानी आमच्यामधली औपचारिकता क्षणार्धात दूर केली.

१९६७ च्या शेवटी शेवटी मत्रिमडळाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला. तो निर्णय, शिक्षणमत्री म्हणून जे काही मी धोरण अनुसरल होत, त्याच्या सपूर्णपणे विरुद्ध होता. मी नेहमीच ठामपणे माडीत आलो आहे, की शिक्षणाच माध्यम इग्लीशमधून प्रादेशिक भाषेत जर करायच असेल तर ते अगदी हळुवारपणे, अत्यत सथगतीने केल पाहिजे. पण त्याचबरोबर इग्लिश शिकवायच्या सोयीसुद्धा अद्ययावत केल्या पाहिजेत.

पण आता मत्रीमडळाने निर्णय घेतला होता, की हा इग्लिशमधून प्रादेशिक भाषेतला जो बदल आहे, त्याला ठराविक कालमर्यादा हवी व ती पाच वर्षाची हवी. हा निर्णय माझ्या मते अत्यत अव्यवहार्य व हानीकारक होता. याने दोन परिणाम होण्याची शक्यता होती. एकतर शिक्षणाचा दर्जा खालावण्याची भीती व राष्ट्रीय एकजुटीलाही त्याने तडा गेला असता. स्वतःच्या मातृभाषेतून शिक्षण हा विचार मलाही पटतो. पण त्यावेळी प्रादेशिक भाषातून शिक्षण देणारे शिक्षक नव्हते. त्याना तस तयार करण्याकरिता काही योजना नव्हत्या. पुस्तके प्रादेशिक भाषेत चागली नव्हती. विज्ञानाच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर जगातल्या घटना सतत ज्ञात करून घ्यायच्या असल्या तर इग्लिश जर्नलशी सतत सपर्क ठेवायला लागणार होता. हिंदीने इग्लिशच स्थान घेण्याबद्दल मला काही म्हणायच नव्हत. पण आता तर प्रादेशिक भाषा हिंदीलासुद्धा उखडवून टाकणार होत्या. राष्ट्रीय एकात्मतेचे असलेले सबध यामुळे तुटणार होते.

माझी खात्री पटली होती, की या प्रश्नावरती मौन धारण करणे म्हणजे या धोरणाला मान्यताच देणे. पण मत्रीमडळाच्या सामुदायिक जबाबदारीमुळे मला एक तर न पटूनही या धोरणाचा पाठपुरावा करावा लागणार होता. मत्र्याला असं म्हणता येत नाही की, मी

त्या धोरणाशी सहमत नाही. पण करणार काय! शिक्षणखात्याने तो निर्णय घेतला आहे. मला काय करायचय, धोरण आपलं थोडच आहे! धोरण तर शिक्षणखात्याचं आहे. एकदा तुम्ही कुठल्याही धोरणाचे समर्थन करायचे ठरले की, ते खरोखर तळमळीने स्वत ची शक्ती पणाला लावून केले पाहिजे. पण हा निर्णय मला पटणारा नव्हताच. त्यामुळे मत्रीमडळाच्या या निर्णयावर मौन जरी मी पाळले असते तरी म्हणणारे म्हणालेच असते, की छगलाना हा निर्णय मान्यच आहे

पण एखाद्या गोष्टीवरून आपले पटले नाही म्हणजे ताबडतोब काही राजीनामा द्यायचा नसतो. तसेच जर करायला लागले तर मत्रीमडळाचे कामकाजच चालू शकणार नाही. कुठल्याही प्रश्नावर मत्रीमडळाच्या निर्णयाशी 'तडजोड' करताना स्वत च्या मूलभूत तत्त्वाना तर बाध येत नाहीना हे बघितले पाहिजे. पण एकदा का तुम्हाला पटले, की काही गोष्टी आपल्या मूलभूत तत्त्वाला विरोधक आहेत, तर त्या गोष्टीच समर्थन करण्यासारखे दुसरे पाप नाही.

अशावेळी त्याच कर्तव्य काय? अगदी सोप आहे. त्याने राजीनामा देण व जाहीरपण मत्रीमडळाच्या निर्णयाशी त्याचे काय मतभेद आहेत हे समजावून देणे.

या प्रश्नावर मी पुष्कळ विचार केला. मात्र तसे पुढे बरेच प्रॉस्पेक्टस होते व या खात्याला येऊनही मला फार काही दिवस झाले नव्हते. सप्टेंबरमध्ये माझी व ग्रोमिकोची भेट ठरली होती. युनोच्या आमसभेला पण मला भारतीय शिष्टमडळाच नेतृत्व करायच होत हे सगळ सोडून विजनवासात रहाण हे काही सोप नव्हत. पण अशावेळी व्यक्तीना महत्त्व नसत. किंबहुना काही व्यक्तीचा स्वार्थत्यागच देशाला उपकारक ठरतो. त्यामुळे ३१ ऑगस्ट १९६७ ला मी माझा मत्रीपदाचा राजीनामा पतप्रधानाकडे पाठवला. त्या बरोबर माझी कारणही पाठवली. या बाबतीत मला हेही सागायलाच हव, की पतप्रधानानी सुद्धा माझ मन वळवण्याची शिकस्त केली.

शेवटचा प्रयत्न म्हणून त्यानी मोरारजीना माझ मन वळवण्याकरता पाठवल. पण मीच त्याना तत्त्वनिष्ठेची आठवण करून दिली. व त्याच्या तत्त्वनिष्ठ वागणुकीचा दाखला मी घेतला. कारण त्यानीच मला वेळोवेळी सागितल होतं, की एखाद्याच्या सदसद्विवेक बुद्धीला जर एखादी गोष्ट पटत नसेल तर त्याने ती करू नये. व वरील निर्णय तर बिलकूल माझ्या तत्त्वाविरुद्ध होता, जो माझ्या मनाला कधीच पटणारा नव्हता. त्यामुळे मोरारजी साहाजिकच निरुत्तर झाले.

सप्टेंबर ५ पर्यंत माझा राजीनामा म्हणजे अगदी गुपित राहिलं होत. 'पतप्रधान व मी सोडून ते कुणालाच ठाऊक नव्हत. त्याचवेळात युनोतल माझ भाषण माझ्यासमोर तपासण्यासाठी ठेवण्यात आले. त्यात मी योग्य ते फेरबदल केले. हेच भाषण मी पुढे युनोत वाचणार होतो. त्याचदिवशी सकाळी वॉशिग्टन पोस्टचे एक प्रमुख वार्ताहर वॉरन उन्ना आले. त्याच्याशी माझी मुलाखत झाली. चागल्या गप्पा झाल्या.

तसा मी राजीनामा ३१ ऑगस्टलाच पतप्रधानांकडे पाठवला होता. ५ सप्टेंबरला जेव्हा मी पतप्रधानाना कळवले, की मी वृत्तपत्रामध्ये आता माझा राजीनामा जाहीर करतो, तेव्हा त्यानी मला थोडं थाबायला सागितल. पण मी त्याना सागितल की आता त्याने काही फारस साधलं जाणार नही.

## राजीनाम्याचे स्वागत

माझ्या राजीनाम्याच वृत्त ऐकून मला सकाळीच भेटलेल्या वॉरन उन्ना यानी मला लिहिल, की त्या दिवशी वार्ताहर म्हणून पुढे होणाऱ्या घटनाची चिन्हे ओळखण्यात मी व रॉयस्टर तुमच्या बाबतीत सपूर्णपणे अशस्वी ठरलो आहोत. त्या दिवशी तुम्ही अत्यत प्रसन्न होता. त्यावेळी त्यानी पुढे हेही लिहिल, की तुमच्या राजीनाम्याविषयी मी काही लिहिण फारस औचित्यपूर्ण ठरणार नाही. पण आपली गेल्या दशकातील मैत्री मला पुष्कळ काहीस देऊन गेली आहे वार्ताहराचं जीवन तुम्ही नेहमीच आनदी केल. तुम्ही युनोत असा नाहीतर तुमच्या लचटबलवर! प्रत्येक वेळी तुम्हाला भेटून आल्यावर पुष्कळ श्रीमत झाल्यासारख वाटायच!

त्या दिवशी सध्याकाळी मत्रीमडळाची बैठक होती. मी गेलो नाही. हो, काय अर्थ होता त्यात!


खरं तर इथेच माझी कहाणी सपल्यासारखी झाली. राजीनाम्यानतर एका आठवड्यातच मी दिल्ली सोडली. मला विमानतळावर निरोप द्यायला अनेक देशाचे राजदूत व आमच्या परराष्ट्रमत्रालयाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. एक आमचाच डेप्युटी मिनिस्टर सोडून मत्री लोकापैकी कोणीच हजर नव्हत. कृष्णमेनन याच्या वेळच दृश्य किती वेगळं होत! पतप्रधान धरून सगळे मत्री झाडून हजर होते. पण मला तरी या घटनेबद्दल खेद का वाटावा? मला चागलच कळत होत, माझ्या सहकाऱ्याना काय वाटत होत माझ्याविषयी ते. तस आता मला काही महत्त्व राहिल नव्हत. माझ्या हाती सत्ता नव्हती अथवा कॉंग्रेसपक्षात माझा कपू नव्हता की मते मिळवून देण्याच्या दृष्टीने मी उपयुक्त नव्हतो. मग उगीच वेळ फुकट का घालवा!

पण जनता व वृत्तपत्रे यानी मात्र या निर्णयाच स्वागत केल.

पुष्कळ लोक म्हणाले की खर म्हणजे पश्चिम आशियाच्या प्रश्नावरून छगलानी राजीनामा दिला. पण नाही या माझ्या भूमिकेला पतप्रधानाचा मला सपूर्ण पाठिंबा होता. चीन सवधात मी काही फार क्रातीकारक फेरबदला सुचवले नव्हते. त्या मुळे काही नव्हते तरीही एकदरीत लोकानी या निर्णयाच स्वागतच केल.

सी. एस. पडीत यानी सडे स्टँडर्ड मध्ये लिहिल की स्वत च्या तत्त्वाशी एकनिष्ठ राहून सत्तेच पद सोडता येत हेच छगलानी दाखवून दिल त्यामुळे जनमानसात त्याची प्रतिमा नक्कीच उचावेल यात काहीच शका नाही.

[ क्रमश. ]




भास्कर दोडे, पुणे

तीस पस्तीस वर्षांची सवय.

साडे दहाचं कार्यालय पण आबासाहेब दहालाच हजर. चपराशांची वेळ दहाची असे म्हणून कोण वेळेवर आलं, कोण नाही, हे पाहाणं आवश्यक असायचं. आबांची तेवढ्या-साठी गर्दी. शिवाय बसही लवकर मिळायची. अर्धातास आधी जेवायला बसावं लागे पण सवयीमुळे त्याचं काही वाटेनासं झालं. या लवकर येण्यामुळं अनेक चपराशी त्यांच्यावर नाराज होत. मनात जळफळत. पण दहाचा नियम आबांनी थोडाच केलेला होता ?

सकाळी दहाला येणं त्यांच्या हाती होतं. पण कार्यकाळी घरी परत जाणं ? अहं. ते मात्र त्यांच्या हातात नव्हतं. साहेब जेव्हा घरी निघतील तेव्हाच ते आपल्या खुर्चीतून उठणार.

साहेबांचं ठीक होतं.

ते तीनला यायचे नि सात-आठपर्यंत बसायचे. क.म करायचेच असं नाही, काही वाचीत रहायचे. ताजे दैनिक, मासिक, अलिकडच्या काही कादंबऱ्या, कथासंग्रह वा नुकतेच प्रसिद्ध झालेले कुणाचे आत्मचरित्र. ते साडेपाचलाच घरी गेले असते, तरी काहीच बिघडत नव्हतं पण निदान चारपाच तास कार्यालयात बसलं पाहिजे ना. मात्र आबांनी हा विचार कधी केलाच नाही. तीस पस्तीस वर्षात अनेक वरिष्ठ आले आणि गेले परंतु या ना त्या कारणाने साहेब रात्री सात आठपर्यंत थांबायचेच.

आबांना ती सवय अगदी अंगवळणी पडली. कधी कुणा वरिष्ठांना त्यांनी साडे-पाच वाजता घरी जाण्याबद्दल विचारलं नाही. सदैव शेळी राहिले. कोकरू राहिले. शेर कधी होताच आलं नाही.

आज ते सेवा निवृत्त झाले.

दुपारी सर्वांनी स्तुतीपर भाषणं केली.

चहाचिवडा फराळ झाला.

हारगुच्छ झाले.

साडेपाच ऐवजी पाच चाळीस झाले म्हणून दोनचार लिपिकांनी किती कुजबूज केली. काही शहाणे कर्मचारी मागे बसले नि कार्यक्रम सुरू होताच मागच्या मागेच, पसार झाले !

पाच पचेचाळीसला आज प्रथमच आबा-साहेब कार्यालयाच्या बाहेर पडले होते.

अरे ! किती रम्य ही वेळ !

शहरी जीवनात सकाळ आणि संध्याकाळ नसतेच असतो दिवस, असते रात्र ! दिवस कार्यालयात जातो. रात्र, घर असल्यास घरात जाते प्रातःकाळची निसर्गशोभा, क्षणोक्षणी बदलणारे आकाशाचे रंग. पक्ष्यांची चिवचिव–किलबिल, सगळं सगळं पुस्तकात फक्त वाचायचं त्यावरून अनुभव घ्यायचा. प्रत्यक्षानुभवाला संधीच कुठे ?

पाच पचेचाळीस म्हणजे हिवाळ्यातली सायंकाळची वेळ. दिवस लहान, रात्र मोठी.

आबा चौकात येऊन उभे राहिले.

अगदी आजच शहरात आल्यासारखे–नवखे अगदी नवेनवे. यापूर्वी ही गर्दी पाहिल्याचं त्यांना आठवेचना. गाव ओळखीच वाटेना, रस्ता ओळखू येईना, माणसं तर अगदीच अनोळखी. सायकली, मोटारी, विविध प्रकारच्या स्कूटर्स–अरेच्या, स्त्रिया आणि मुलीसुद्धा स्कूटर्स चालवितात. अगदी पुरुषाप्रमाणे वेगात ? त्यांचे डोळे विस्फारले गेले !

स्वातंत्र्य मिळण्याआधी दहा वर्षे ते या कार्यालयाची पायरी चढले–एक उमेदवार म्हणून. नव्या आशाआकांक्षा उरी बाळगून. दहा वर्षांनी ते कनिष्ट लिपिकाच्या पदावर 'नियमित' झाले मग वरिष्ठ लिपिक, पर्यवेक्षक लिपिक करीत करीत 'कार्यालय अधीक्षक' झाले गाठीला अनुभव खूप होता पण 'पदवी' नव्हती आणि म्हणून येथेच अडकून पडले सीमा संपली. पगारवाढही खुटली. सगळं थांबलं पण घड्याळ चालूच राहिलं वय वाढत गेलं. निवृत्ती आली. झालीसुद्धा !

चौकातली गर्दी पाहण्यात आबा स्वतःला हरवून बसले होते

दिवसभर काम केल्याने थकल्या चेहऱ्याने वयस्कर आणि उत्साहाने तरुण शरिरे कुठे कुठे निघाली होती–तेवढ्यात त्यांना धक्का बसला–तरुणीचा. नाकाला सुवास जाणवला. एकच गंध नव्हता. अनेक. स्नो-पावडरचा, नव्या कपड्याचा, वेणीचा आणि हो–तारुण्यपूर्ण शरिराचा देखील ! नाक एकदम जिवंत झाल्यासारखं वाटलं.

आपलं आज काय बरं वय ?

निवृत्त झालो त्या अर्थी पचावन्न तर नक्कीच ! आणखी नोकरी करण्याची इच्छा आहे. अर्ज केला आहे बघू या इथेच, नाही तर कुठे तरी. सरकार आपला उपयोग करून घेणार 'अनुभवी हात' आहे ना ?

कोण हसलं आता ? ओह ! नवपरिणित दिसतात. अगदी गर्दीत देखील सगळ्या जगाला विसरून, दोघांचीच जाणीव ठेवून, हातात हात गुंफून, अंगाला अंग भिडवून काय गुलगुल गोष्टी करताहेत हे ? एकमेकांकडे पाहताना किती प्रीतीपूर्ण नजरा एकमेकांच्या नजरेत अगदी खोलवर डुबवीत आहेत !

समोरून येणाऱ्या कुटुंबाकडे त्याचं लक्ष गेलं, ते तान्ह्याच्या गोड, सुरेल रडण्यामुळे ! लहान, तान्ही मुलं इतकी कर्णमधूर रडतात? आपल्याला किती मुलं झाली ? सर्वांत मोठी सुषा, नंतर अविनाश, नंतर...तान्ह्या मुलाचं रडणं ऐकल्याचं त्यांना काही केल्या आठवेना ! आठवणार तरी कसं ? सकाळी निघणार तेव्हा मूल झोपलेलं, खेळत असलेलं नाहीतर आबांना त्रास नको म्हणून कुणा शेजाऱ्याकडे नेलेलं...रात्री ते परतणार तेव्हा सगळं सामसूम. रात्री बेरात्री कदाचित तान्ह्याने रडण्याचा आवाज काढलाही असेल, पण दिवसभरच्या श्रमाने गाढ झोपलेल्या जिवाला कसली जाग येणार ?

म्हाताऱ्याची काठी पायावर टेकवली गेली तेव्हा ते कितीतरी कळवळले. बाजूला सरले. सरले म्हणजे काय, तर अर्धएक पाऊलभर जागा बदलली. गर्दीच इतकी होती की सरकायलाही जागा अपुरी पडावी. म्हाताऱ्याबरोबर असलेल्या तरुणाने काठी हातात घेतली. आबांकडे अपराधी चेहऱ्याने पहात 'सॉरी' म्हणाला आणि चालू लागला. म्हाताऱ्याला समोर बोट दाखवीत त्या तरुणाने इमारतीची माहिती देण्यास सुरुवात केली. बापलेक दिसतात. नोकरीनिमित्त तो तरुण इथे शहरात आला असावा. गावाकडील खेडवळ वडिलांना हे शहर हिंडविताना, माहिती देताना मनात खंत, लाज वाटत असेल का, त्या अद्ययावत पोशाखातील तरुणाला ? मुळीच नाही. कारण त्याचं म्हाताऱ्याशी वागणं किती आदराचं, प्रेमाचं आहे.

आपण आपल्या वडिलांना अशा कलत्या संध्याकाळीच काय पण कधीकाळीही शहर दाखवू शकलो नाही. कारण...कारण... वेळच नव्हता ना. ऑफीस...ऑफीस... ऑफीस ! तुकारामाला, ज्ञानेश्वराला जसा एकच ध्यास लागलेला होता, तसाच आपल्याही. त्यांचा पंढरीचा पांडुरंग होता, आपला कार्यालयातील साहेब. त्यांचं ते मंदिर तर कार्यालय हेच आपलं मंदिर ! त्यांनी शेवटी खूप मिळवलं. आपण ?

रहदारीनियंत्रण करीत चौकात उभ्या असलेल्या पांढऱ्या रंगातील पोलिसाच्या मदतीला आता चारही कोपऱ्यात असलेले पोलसिग्नल्स धावून आले होते. कारण काळोख पडू लागला होता.

अरेच्या ! संध्याकाळ झाली आणि हां हां म्हणता संपलीही. संध्याकाळ संपली नि रात्र येण्यास सुरुवात झाली आहे. हो. आजच्या दिवसाची आणि आपल्या आयुष्याचीही !

आबांच्या अंगावर काटा उभा राहिला. कित्येक वर्षांपूर्वी शाळेत शिकलेली, पाठ केलेली, 'संध्याछाया भिवविती हृदया' ही ओळ आज नेमकी कशी आठवली ? आयुष्याची संध्याकाळ झाली. आता हळुहळू रात्र येईल...रात्र...

आबांना चौकातलं काहीच दिसेनासं झालं. डोळ्यात अश्रू उभे राहिले. आयुष्यातले शेकडो नव्हे, हजारो दिवस–विशेषतः संध्याकाळमधले–घरंगळून गेले ते आता दिसणारही नाहीत. मग गोळा करायची गोष्ट दूरच !

□ □

# ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारल्याशिवाय शहरवासियांचे प्रश्नही सुटणार नाहीत

वसंत देशपांडे, अध्यक्ष, ग्रामायन

स्वातंत्र्य संग्रामात म. गांधींनी स्वदेशीला अनन्य साधारण स्थान मिळवून दिले. ब्रिटिशांच्या मालावर बहिष्कार म्हणजे ब्रिटिश अर्थव्यवस्थेला टोला व त्याचबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेला खतपाणी हे गांधीजींनी जाणले. त्यामुळे स्वदेशीचे दुधारी अस्त्र उपयुक्त ठरले.

पण गांधीजी केवळ स्वदेशीवर भर देत नव्हते. स्वदेशी वस्तूंमध्ये ग्रामोद्योगात तयार झालेल्या वस्तूंना त्यांनी प्राधान्य दिले होते. कापड गिरण्यात तयार झालेल्या कापडाऐवजी साध्या चरख्यावर तयार केलेले कापड त्यांना हवे होते व सामान्य लोकांनी त्याचा वापर करावा असा त्यांचा आग्रह होता. त्यापाठीमागे गांधीजींची विशिष्ट विचार प्रणाली होती. ब्रिटिश राजवटीच्या पहिल्या कालखंडात भारतातील उद्योगधंदे जमीनदोस्त झाले. हे सर्व उद्योगधंदे लहान आकाराचे व विखुरलेले होते. हे उद्योगधंदे नष्ट झाल्यामुळे भारत शेतीप्रधान देश बनला. नंतरच्या कालखंडात आधुनिक मोठ्या आकाराचे उद्योगधंदे स्थापन झाले पण ते फक्त काही थोड्या शहरात केंद्रीत झाले. या उद्योगधंद्यांचा ग्रामीण उद्योगावर विपरीत परिणाम झाला. ग्रामीण भागाचे शोषण मागील पानावरून पुढे चालू राहिले. ग्रामीण अर्थव्यवस्था झपाट्याने मोडकळीस आली. म्हणून स्वदेशीचे अस्त्र जसे परकीय सत्तेविरूद्ध होते तसेच ब्रिटिश निर्मित अर्थव्यवस्थेविरूद्धही होते. एकाच अस्त्राने परकीय सत्तेला टोला द्यावयाचा व त्याचबरोबर भारतीय विकासाचा पाया घालावयाचा असा गांधीजींचा विचार होता.

तपशीलात मतभेद असले तरी गांधीजींचा हा रोख योग्य दिशेने होता असे म्हणावयास हरकत नाही. पंचवार्षिक योजनांचे पर्व सुरू झाले त्यावेळी ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन करणे यास सरकारने महत्त्वाचे स्थान दिले. विकेंद्रित अर्थव्यवस्था, उद्योगधंद्यांचे विखुरीकरण, लघुउद्योगधंदे व कुटीरउद्योग यांची जोपासना, समाईक उत्पादनाच्या योजना इत्यादी उपक्रमांना सर्व पंचवार्षिक योजनात महत्त्वाचे स्थान दिले होते. एका बाजूस सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रात व काही प्रमाणात खासगी मालकीच्या पण नियंत्रित क्षेत्रात आधुनिक उद्योगधंद्यांची उभारणी करावयाची व त्याचबरोबर इतर उत्पादनक्षेत्रात लहान आकाराच्या व ग्रामीण भागातील उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यावयाचे अशा स्वरूपाचे धोरण सरकारने मान्य केले. त्यात हेतु हाच होता, की ब्रिटिश आमदानीत निर्माण झालेला उद्योगधंद्यातील असमतोल व नागरी-ग्रामीण भागातील विसंवाद दूर करावयाचा.

परंतु धोरण काहीही असले तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी अधिक महत्त्वाची असते. या दृष्टिकोनातून पाहता आजवरची वाटचाल अपयशी ठरलेली दिसते. एक पाऊल पुढे गेले परंतु दुसरे पाऊल मागेच राहिले. आधुनिक कारखाने निघाले परंतु ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यात फारसे यश आले नाही. उद्योगधंद्यांचे विखुरीकरण कागदावरच राहिले व पूर्वीची मोठी शहरे मात्र झपाट्याने वाढत राहिली. देशाचा आर्थिक विकास म्हणजे काही शहरांचा व काही उद्योगधंद्यांचा विकास हे समीकरण रूढ झाले. अणुशक्तीचा विकास, मोटारी, पंखे, फ्रीज इत्यादी वस्तूंचे गरजेपेक्षा अधिक उत्पादन, अलिशान हॉटेल्स व इमले यांची वाढती गर्दी एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला अत्यावश्यक वस्तूंची दुर्मिळता, वाढते दारिद्र्य व बेकारी. अफाट ग्रामीण भाग पूर्वीप्रमाणेच मृतवत आणि कलाहीन राहिला. नवीन कारखाने बहुसंख्येने ठराविक शहरातच केंद्रीत झाले.

गांधीजींना परमेश्वरासमान मानणाऱ्या त्यांच्या नावाचा सतत घोष करणाऱ्या समाजाला हे सर्व धोरण तपासून पाहणे आवश्यक आहे. यावर उपाय काय ?

ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन व्हावयाचे असेल तर सरकारी व बिगर सरकारी क्षेत्रातून प्रयत्न व्हावयास हवेत. सरकार यथाशक्ती प्रयत्न करीत आहे असे आपण ऐकतो. त्याचा पुरावा म्हणून हरतऱ्हेच्या योजनांचा निर्देश करता येईल. ग्रामीण भागात उद्योगधंदे निघावेत म्हणून विशिष्ट सवलती व प्रलोभने देऊ केलेली आहेत; तांत्रिक-आर्थिक सहाय्य देण्याची व्यवस्था आहे. औद्योगिक वसाहतींचे जाळे निर्माण केले आहे; या व अशा स्वरूपाच्या अनेक योजना सरकारी प्रयत्नांचा दाखला म्हणून सादर करता येईल. त्यात काही तथ्य असले तरी मुख्य प्रश्न हा की या योजनांची फलश्रुती काय ? या योजनांना जर भरपूर यश आले नसेल तर त्याची आपण दखल घेतली आहे काय ? इतर अन्य उपायांचा विचार केला आहे काय ? का साराच खटाटोप म्हणजे मृगजळापाठीमागे धाव होती.

जरा विचार केला तर असे दिसून येते, की या सर्व योजनांना आपण कर्मकांडाइतकेच महत्त्व दिले. सरकारच्या सदिच्छाचा हा दाखला मानता येईल पण प्रयत्नांचा

नव्हे. आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी सर्व शक्ती व युक्ती पणास लावून प्रयत्न करावयास हवेत. त्यालाच आर्थिक नियोजन म्हणतात. जी गोष्ट सहजपणे होते किंवा थोड्या प्रयत्नाने होते त्यासाठी नियोजनाची आवश्यकता नाही. नियोजन म्हणजे आपणास हवे असलेले उद्दिष्ट साध्य होण्यासाठी यशस्वी केलेले प्रयत्न.

सवलती व प्रलोभने याचा वापर ग्रामीण अर्थव्यवस्थेस चालना देण्यासाठी अपुरा पडल्यानतर नव्याने विचार करण्याचे काम झाले नाही सरकारी अधिकारी, नियोजनकार व राजकारणी पुढारी हे प्रामुख्याने शहरवासीय असल्यामुळे नागरिविकास जितक्या जिव्हाळ्याचा तितका ग्रामीण भागाचा विकास जिव्हाळ्याचा वाटला नाही. ग्रामीण भागाकडे मुद्दामच दुर्लक्ष केले असे नव्हे. शहरातील उद्योगपती, शासनाधिकारी, पुढारी व नियोजन विषयातील तज्ञ लोक याचे हितसबध्र सहजपणे जुळले जातात व योजना तयार होत असताना व त्याची अमलबजावणी होत असताना ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होते एवढेच !

आजपर्यंत चोखाळलेल्या मार्गापेक्षा अधिक प्रभावी व परिणामकारक मार्ग शोधून काढणे निकडीचे आहे. एक मार्ग दिसतो तो असा, की सरकारी व इतर सस्था यानी, स्वत साठी लागणारा हरतऱ्हेचा माल मोठ्या प्रमाणावर ग्रामीण-उद्योगधद्याकडून विकत घेणे. सरकारचे खरेदी धोरण एक प्रभावी साधन म्हणून वापरता येईल. खुद्द राज्य व केंद्र सरकारच्चा कचेऱ्या, जिल्हा परिषदा, सहकारी सस्था, शैक्षणिक व इतर सस्था याना दैनदिन कारभारासाठी अनेक प्रकारचा माल लागतो. हा माल आज प्रामुख्याने मोठ्या शहरातील कारखान्यात तयार झालेला असतो. हा माल नियमितपणे ग्रामीण भागातील उद्योगाकडून घेतल्यास त्या उद्योगांना मोठी चालना मिळेल. इतर कोणत्याही सवलती व प्रलोभनापेक्षा या मार्गाने मिळणारे उत्तेजन अधिक परिणामकारक ठरेल. या मालाची प्रत उत्तमच असेल असे नाही; एखादेवेळेस किंमतही जरा जास्त असू शकेल. परतु इतर सवलतींच्या सदर्भात ही उणीव फारशी मोठी वाटणार नाही. कालांतराने ही उणीव देखील भरून निघू शकेल. या धोरणाचाच भाग म्हणून, नवीन कोणते उद्योगधदे ग्रामीण भागात काढता येतील, त्यातील उत्पादनतत्राचा विकास कसा घडवून आणता येईल, कोणते तात्रिक शिक्षण द्यावे लागेल इत्यादी अगोपागाचा विचार व्हावयास हवा. प्रामुख्याने लहानमोठ्या शहराची साखळी निर्माण करणे हे सर्वसाधारण उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून योजना आखावयास हवी.

सरकारी धोरणास पोषक असे धोरण खाजगी सस्थानी व प्रत्येक व्यक्तीने अवलबावयास हवे. कोणतीही वस्तू विकत घेताना त्याची किंमत व सुबकता याकडे लक्ष देऊ नये; तर त्यामुळे काही विशिष्ट भागाना व उत्पादकाना उत्तेजन मिळावे याकडेही लक्ष द्यावे. ग्राहकाच्या सहकारी सघटना स्थापन होऊन त्याना बळकटी आल्यास हे धोरण अधिक परिणामकारक होऊ शकेल. शहरांकडे ग्रामीण भागातील बेकाराची धाव वाढत्या झोपडपट्टयाचे शहराभोवती पडलेले वेढे, भिकाऱ्याची भयावह सख्या इत्यादी गोष्टी टाळण्याचा एक मार्ग ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था सुधारणे हा आहे हे शहरवासीयानी जाणले पाहिजे आणि म्हणून आपल्यापरीने आपण प्रयत्नही केले पाहिजेत. केवळ सरकारचे हे काम आहे असे मानून व सरकारच्या धोरणावर टीका करून भागणार नाही.

म गाधींच्या स्वदेशी चळवळीला नवीन आशय देण्याची ही वेळ आहे. □ □

## सायप्रस

पृष्ठ १२ वरून

ठरवून टाकायचे हे अमेरिकेचे जुने तत्र किसिजर अनुसरत आहेत. 'भूमध्य समुद्रातील केस्ट्रो' अशा शब्दात त्यानी मकारिओसचे वर्णन केले. वास्तविक मकारिओस याच्या धोरणाचा हा विपर्यास आहे. ते तटस्थतावादी जरूर आहेत. पण अमेरिकेस पाठिबा दिला नाही म्हणून, ते एकदम 'केस्ट्रो' कसे ठरतात? सायप्रसच्या लोकशाहीच्या लढ्याला पाठिबा देण्याचे आवाहन त्यानी जगातील सर्वच राष्ट्राना केले आहे, केवळ कम्युनिस्ट राष्ट्राना नव्हे. ब्रिटननेही त्याना पाठिबा दिला. पण अमेरिकेला सायप्रसच्या लोकशाहीपेक्षा आपले लष्करी हितसबंध अधिक महत्त्वाचे वाटतात. मकारिओस याना पाठिबा देऊन ग्रीसच्या लष्करी सत्ताधिकाऱ्याना दुखविण्याची अमेरिकेची इच्छा नाही. ग्रीसमध्ये अमेरिकेचे हवाई व नाविक तळ आहेत. या तळाना धोका निर्माण होईल असे काहीही अमेरिका करू इच्छित नाही. मकारिओसना अमेरिकेने पाठिबा दिला तर आपल्याला विरोधाची ही भूमिका आहे असा त्याचा अर्थ ग्रीसचे लष्करी सत्ताधारी लावतील आणि ग्रीसमधील अमेरिकेचे तळ काढून घेण्याची मागणी करतील असे अमेरिकेस वाटते म्हणून ग्रीसच्या लष्करी राजवटीस तिचा विरोध नाही. हेच दुसऱ्या शब्दात सागावयाचे तर अमेरिकेचा ग्रीसमधील लोकशाहीच्या लढ्याला पाठिबा नाही तसाच सायप्रसमधील लोकशाहीच्या लढ्यालाही नाही. सायप्रसच्या प्रश्नाशी बड्या राष्ट्राचे आतरराष्ट्रीय राजकारण असे निगडीत झालेले आहे.

□ □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

ब. मो. पुरंदरे | किंमत सात रुपये | राजहंस प्रकाशन

# न ये चाँद होगा

नीना शाह

परवाच्या 'हमेशा जवां' मधील शेवटचे गीत होते 'दो भाई' मधील 'मेरा सुदर सपना बीत गया'– रात्री अकराचा सुमार, सारे मालवलेले दिवे आजूबाजूचे शात वातावरण आणि त्यातच एक शात तेवणारी मेणबत्ती. गुणगुणणारे सूर घशातच अडकू लागले, मन एकदम सैरावैरा धावू लागले व एकदम वीस-पचवीस वर्षे मागे गेल. तो काळ होता नवीन नवीन गायकाच्या आगमनाचा. खूपसे गायक येत होते आणि विना प्रसिद्धी परतत होते. एक दिवस त्यातच एका नवीन नावाची भर पडली–गीता रॉय. नाव ऐकता क्षणीच खूप खूप आवडणार होत. नाजूकस बगाली. तिच पहिल गाण आम्ही ऐकल ते हॉटेलातल्या गोधळात. पण दोन ओळी ऐकताच सार शात झाल होत. त्या गीतातील दर्दचा अमल हळू हळू साऱ्यावर पडत होता. त्यातील 'ओऽऽ छोडके जाने वाले आ, दिल तोडके जाने वाले आऽऽ' मधील आलाप तर अजून जसेच्या तसे आठवतात. गाण सपताच आम्ही चौकशी केली व तेव्हाच या मनान ठरवून टाकल की पोर नक्की नाव काढणार. कुठंतरी वाटत होत तिने इतरासारखे अल्पकाली येऊन जाऊ नये. आणि कुठतरी असही वाटत होत की, हिने फक्त अशी दर्दगीतेच गाऊ नयेत. हिचा आवाज खरा चुलबुल्या गाण्यापुरताच आहे.

थोड्याच दिवसात तिच अपेक्षेप्रमाणे दुसर गाण ऐकण्यात आल १९५३ मध्ये. फिल्म 'बाजी'मध्ये. दिग्दर्शक होते गुरुदत्त आणि चित्रपटात ते गाण पेश करणार होती नटखट आणि गोड गीताबाली आणि तिच्या त्या नटखट अभिनयाकरिता गाणं पेश केल होत 'गीता रॉय'ने.

'सुनो गजर क्या गाये,
समय गुजरता जाये.'

या गाण्याने त्या काळात फारच आघाडी मारली होती. व गीताला प्रसिद्धीच्या शिखरावर पोचविले होते. परंतु मला सर्वात आवडत होता तो 'तदबिरसे बिगडी हुयी तकदीर बनाले'मधील प्रत्येक कडव्यानंतरचा लाडिक आलाप.

त्यातील तिसऱ्या गाण्याने तर अगदी कमालच केली होती–

'आजकी रात पिया, दिल न तोडो
'मन की बात पिया मानलो.'

या गाण्याने एकाच वेळी दोन हृदये जिंकण्याच महत्त्वाच कार्य केल होत. आपल्या अतरात्म्यातून निघालेला सारा दर्द, सारी तळमळ तिने त्यात ओतली होती आणि त्यामुळेच त्यावेळचे आघाडीवीर देव आनद नि कल्पना कार्तिक एकमेकात गुतले नि गीताही बरीच गुरुदत्तजवळ पोहोचली.

अर्थात लग्नापूर्वी गीताबाली व गुरुदत्त याच्या सबधाबाबत बरेच काही बोलले जात होते आणि अर्थातच गुरुदत्तचे महत्त्व, दर्जा लक्षात घेता, त्याचे लग्न त्याच क्षेत्रातील एखाद्या प्रसिद्ध अभिनेत्रीशी होईल ही साधारण लोकाची अपेक्षा. परतु गुरूने अचानक साऱ्यांना धक्का दिला. गीताबाली एक मन भारावून टाकणारी नि देखणी बगाली बाई होती तर गीता रॉय फक्त एक मोहक चेहऱ्याची नि गोड आवाजाची स्त्री. अशीच स्त्री गुरुदत्तच्या विक्षिप्त मनाला घरात आणावीशी वाटली. त्याची ही दोन गीता मधील आवड अचूक होती. लग्न झाल (१९५३), मुल-बाळ झाली. सार व्यवस्थित चालल होत, तरीदेखील गुरुदत्तविषयी पूर्वीप्रमाणेच लिहिले जाई. त्यावर पुष्कळदा गीता चिडून म्हणे– आमच्या सुखात मिठाचा खडा टाकून याना काय मिळत कोण जाणे ?

याच सुमाराला तिची गाणी हीट होऊ लागली होती. जशी आजची 'आशा भोसले'. गुरुदत्तच्या साऱ्या पिक्चर्समध्ये तिचीच गाणी होती व पिक्चर हीट होण्यामागे बराचसा हात तिच्या गाण्याचाच होता असे म्हणावे लागेल. प्यासा नतर निघालेला गुरुदत्तचा 'कागजके फूल' फारसा चालला नाही व त्याबद्दल रिपोर्टही खास नव्हते. तरी देखील गीताच्या 'वक्तने किया क्या हसी सितम' या गाण्याकरिता मी तरी निदान तो चित्रपट दोनदा पाहिला व मला विश्वास आहे की, माझ्याप्रमाणे अनेकानी केवळ गाण्याकरिताच तो पाहिला असावा. हे गाण लागल की, तिचा तो निष्पाप गोड चेहरा डोळ्यापुढून सरकत नाही. खरच का वक्तने तिच्यावर हसी सितम केला होता ?

त्यापूर्वीचेच प्यासामधील एका रगेल वेश्येच्या तोडी असलेले 'जाने क्या तूने कही, जाने क्या मैंने सूनी' ऐकल्यानतर कुणालाही खरे वाटणार नाही की, याच गीताने–वक्तने किया गायले असेल.

त्याचप्रमाणे गुरुदत्तच्याच 'साहिब, बिबी और गुलाम'मधील जवळ जवळ सारी गाणी तिनेच सजविली.

'न जाओ सैयाँ छुडाके बैयाँ,' मध्ये नवऱ्यासाठी दारू पिऊन विनवणारी पतिव्रता छोटी बहू रगविली तर–'पिया ऐसो जीयामे समाली गयो रे' मध्ये नवपरिणिताची नवऱ्याची वाट पहाताना होणारी घालमेल सुरातून खेळविली आहे. व त्यातीलच Climex गाणे– 'पीया धीरे धीरे चले आओऽऽ' मधील दर्द अजून विसरला जात नाही. त्याचप्रमाणे चौदवीका चाँद मधील– 'बालमसे मिलन होगा' मधील 'मारेंगे नजर सैयाँ' जसे ठसक्यात म्हटलय् कदाचित ते दुसऱ्या कुणालाच जमले नसते.

गुरू व्यतिरिक्तही तिने पुष्कळ पिक्चर्समध्ये गाणी गायली, जवळ जवळ सर्व भाषेत मिळून तिची ६,००० गाणी रेकॉर्ड झाली. त्यातील पुष्कळ गैरफिल्मी गाणीही हिट झाली. उदा. 'सुनी कान्हा तेरी बासूरी' किंवा 'जमुनाके तीर कान्हा आओ रे.'

शर्त मधल्या 'न ये चांद होगा न तारे रहेंगे' सारख्या गाण्याबरोबरच तिने गायले हावडा ब्रीज मधील 'मेरा नाम चिन चिन चू' सारखे नटखट गीत. दोघामधले कोणते सुदर किंवा कोणते आवडते हे सागणे कठीणच. 'आरपार'मधील गाणी ज्याने ऐकली नसतील, त्याचे आर्धे आयुष्य गेले असे समजावे.

'बाबूजी धीरे चलना, प्यारमे जरा सचलना' मधील ठसका म्हणा किंवा–'ये लो मैं हारी पिया' मधील समजावणीच्या सुरातील माधुरी ! साऱ्यांचा दर्जा एकच. मिस्टर अँड मिसेस्ऽऽ मधील–'प्रीतम आन मिलो'मध्ये तिने जी साद आळवलीय ती राधा किंवा मीरा याना देखील लाजविणारीच आहे.

अर्थात तिची सारीच गाणी चांगली होती असे नव्हे. काही काही गाणी तिने फारच बडल गायली. तिने स्वत: तेही कबूल केले होते. व ती फारशी प्रसिद्धही झाली नाहीत. उदा. तूफान और दिया मधील– 'मेरी छोटीसी बहन देखो' किंवा गोदान मधील– 'ओ बेदर्दी क्यू तडपाये.'

असे वरवर पाहता तिला जीवनात सारे काही मिळाले होते. ऐश्वर्य, प्रसिद्धी, गुरू-

सारखा देखणा व बुद्धीमान नवरा. पण तरी देखील तिला बराच मनस्ताप सहन करावा लागला. प्यासा नतर गुरूचे बरेचसे लक्ष वहिदाकडे आकर्षिले गेले होते. अर्थात तो एक कलाकार घडविण्याच्या मागे होता. परतु एकतर गीता पूर्वीपासूनच थोडी सशयी व थोडी चिडकी म्हणून गुरूदत्तने कितीही समजाविले तरी न ऐकणारी. परतु एक गोष्ट तेवढीच खरी होती की, कुठल्याही स्त्रीला आपल्या नवऱ्यावरील, आपल्या अधिकाराविषयी जे तीव्रपणे वाटत तेच तिला वाटत होत. गुरूदत्तचे सगळे प्रेम तिला एकटीला हवे होते. अर्थात तिने हेही कबूल केले होते की, गुरूच अजून माझ्यावर पूर्वीइतकच प्रेम आहे. वहिदाच्या आगमनान ते कमी झाले असे नाही. परतु त्यावरूनच खटके उडून ती त्याच्यापासून वेगळी राहू लागली परतु तरीही त्यांचे सबध अबाधीतच होते.

त्यानंतर थोड्याच दिवसात गुरुदत्त 'गौरी' हा बगाली चित्रपट काढणार होते. त्यात हिरॉईन होती आपली 'गीता'. तसं पाहिल तर त्यानी वहिदाच्या आधीच गीताला घडवायला हवे होते. कारण गीता म्हणजे अस्सल बगाली स्त्री, आणि बगाली म्हटली म्हणजे तिच्यात उपजतच अभिनयाचे गुण असणार आणि त्यात गुरूचे दिग्दर्शन म्हटल्यावर सहजच ती वहिदासारखी चमकली असती. पण ते व्हायचे नव्हते. अभिनेत्री गीता पहावयाचे आपल्या नशिबी नव्हते. कारण 'गौरी' पूर्णच झाला नाही. व त्यामुळे वहिदाबद्दलची तिची मनातली अढी दृढच झाली. त्या बिचारीचे म्हणणे इतकेच होते की गुरूने वहिदाला सोडावी. पण गुरू आपण एवढ्या प्रयत्नाने घडविलेल्या मूर्तीला एवढ्या सहजासहजी सोडायला तयार नव्हता. त्यात त्याने तिच्याकडून जो करार लिहून घेतला होता त्यावर फक्त गीताकरिता तिलाजली देणे शक्यच नव्हते. अशा दोघाच्या हट्टामुळे तणाव वाढतच राहिले. या वारंवार होणाऱ्या वादळावर गुरूकडे उत्तर नव्हते. व ते गीताला पटवून देण्याइतके ते समर्थही नव्हते. अर्थात गीताला सारे समजत होते. व आत्यतिक प्रेमामुळे तिला हे सारे सहन होत नव्हते. पुढे पुढे तर त्याचे तणाव अगदी निकराला पोहोचले. आणि तिला सतत वाटे की, गुरू आणि वहिदा लग्न करणार आहेत. पण आपणच त्याच्या आड येत आहोत. ह्या सतत भेडसावणाऱ्या जाणिवेनेच ती व्याकूळ होई. अर्थात तिने पुष्कळदा वहिदालाही तबी दिली होती. परतु गुरूपुढे तिचे काहीच चालण्यासारखे नव्हते.

अशाही परिस्थितीत ती आम्हाला सुदर गाणी ऐकवीतच राहिली. सी. आय. डी. मधील–

'जाता कहाँ है दिवाने' किंवा 'आखोही आखोमें इशारा हो गया' किंवा जोगन मधील–

'घुघटके पट खोल तोहे पिया मिलेंगे' कारण तसे पाहिल्यास गीता फार समजूतदारपणाने वागत होती. गुरूसारख्या लहरी नि विक्षिप्त माणसाला साभाळणे म्हणजे तोंडची गोष्ट नव्हती. तरी तिने त्याला बऱ्याच कठीण प्रसगी सांभाळून घेतले होते. नाहीतर एखादी असती तर वहिदाशी चागलाच तमाशा केला असता.

*आणि त्यानतर त्यांचे सबधही बरेच* सुरळीत झाले होते. कारण गुरूच्या मृत्यूच्या एका वर्षापूर्वीच त्याना एक मुलगीही झाली होती. जी गुरूची फारच आवडती होती.

मृत्यूच्या आदल्या रात्रीच म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ ला गुरूने मुलीला घेऊन गीताला बोलावले होते परतु लहान मुलीला बरे नसल्याने तिने सकाळी भेटण्याचे कबूल केले. परतु जे आतरिक प्रेम म्हणतात ना, त्यामुळे अगर कशामुळेही म्हणा, तिला रात्रीच काहीतरी पूर्वसूचना मिळाली. म्हणून ती जायला निघाली. परतु तिच्या आईने तिला रात्री जाऊ दिले नाही. ती पूर्ण रात्र तिने तशीच तळमळत काढली व सकाळ होताच बगल्यावर पळाली. पण दार उघडेनाच. म्हणून दार फोडायला लावले व तशीच बेबीला घेऊन आत घुसली आणि तिच्या 'पप्पा, पप्पा' या हाकेतच तिची एक करुण किंकाळी घुमली.

आणि ज्याकरिता इतके दिवस त्रास सहन केला, तोच निघून गेला होता. गीता आता विधवा झाली होती. तिला पुढे आयुष्यभर एकच गोष्ट खात होती की, त्याना रात्री काहीतरी सागायचे होते, ते राहूनच गेले. त्याची शेवटची इच्छादेखील मी पूर्ण करू शकले नाही. त्यात पुष्कळ लोकाच्या मते गीतामुळेच गुरुदत्तानी आत्महत्या केली. आणि त्यानतर तिला मानसिक व्याधींनी इतके घेरले की, ती स्वत:च आयुष्याला कटाळून गेली व त्याकरिता तिने आपले गायनही सोडले. आणि वाटले, आता सुजाता, प्यासासारखी गाणी परत कशी ऐकायला मिळणार ?

पण आता पुन्हा थोड्या दिवसापूर्वीच 'अनुभव'ची गाणी ऐकायला मिळाली नि परत आशेने थोडा अकुर धरला. जरी त्यात थोडा वयस्करपणा आला होता तरी त्यातील माधुरी, नटखटपणा कायमच होता.

'कोई चुपकेसे आके–' ऐकल्यानतर कुणालाही असे वाटणार नाही की, हे नवीन चित्रपटातील गाणे आहे. तसेच–'मेरा दिल जो मेरा होता' हे बाथरूममधील गाण तनुजासारख्या चुलबुल्या नटीला किती सूट होत व एकदम आरपारमधील गाण्याची आठवण होते–काहेको झगडा बालम नयी नयी प्रीत रे.'

पुन्हा वाटल, अजूनही कुणीतरी ऐकवील 'बालमसे मिलन होगा' किंवा 'घुघटके पट खोल तोहे–'

किंवा 'तदवीरसे बिगडी हुयीं तकदीर बनाले'

परतु ती स्वत: मात्र आपली 'बिगडी तकदीर' कधीच बनवू शकली नाही. नि आता तशी गाणी परत गाणारही नव्हती.

२० जुलै १९७२ लाच ती आपल्या स्वरलहरीबरोबरच फार दूर वाहून गेली आणि आम्ही म्हणतच राहिलो,

'मेरा सुदर सपना बीत गया'

खरच, एखाद सुदर स्वप्न थोडा काळ येऊन जाव तशी ती येऊन आम्हाला सतुष्ट करून निघून गेली.

परतु परत २० जुलै आला की उदास मन आपोआपच गुणगुणू लागत–

'चाद है वही, सितारे वही, यही गगन
फिर भी क्यू उदास मेरा मन'

भा. रा. तांबे याच्याप्रमाणे मला तरी वाटत–

'जन पळभर म्हणतील हाय ! हाय ! !
मी जाता त्याचे राहील काय ?'

ही स्थिती प्रत्येकाच्याच वाट्याला येत नाही. काही काही व्यक्तीमुळे आपल फार काही राहून जात, एक अदृश्य धागा सदाच जोडलेला असतो. तो शोधीत आपण हाय ! हाय ! ! करीतच राहतो.

जरी ती फार दूर गेली, तरी आम्हाला एक वचन देऊन गेलेय. ते ती अजूनही पाळतेय व पाळीलही–

'न ये चाद होगा, न तारे रहेंगे
मगर हम हमेशा तुम्हारे रहेंगे'

□ □

## 'कोरा कागज' परीक्षणासंबंधी–

आपल्या 'माणूस' २२ जून ७४ च्या अंकातील 'कोरा कागज' या चित्रपटाचे श्री. ह. शि. खरात याचे परीक्षण वाचल्यानतर मलाच काय, परतु सर्व सामान्य चोखदळ चित्रपट रसिकाना आश्चर्य वाटल असेल निश्चित आणि मग न राहवून शेवटी 'कोरा कागज'च्या निमित्तान चार शब्द लिहावस वाटल.

आज हजारो चित्रपट रसिक, चोखदळ प्रेक्षक, त्याचबरोवर जवळजवळ ९०–९५ टक्के वृत्तपत्रानी 'कोरा कागज'ला रसिक मान्यता दिली. केवळ मान्यताच नव्हे तर कित्येक वृत्तपत्रे नि साप्ताहिके आज त्या चित्रपटाविषयी कॉलम, चार कॉलम खरडीत आहेत. दिग्दर्शकावरोबरच त्या चित्रपटातील कलाकारांच कौतुक करीत आहेत. परतु सगळयानी कौतुक केल म्हणून तुम्ही कराव अस नव्हे! 'पण असा एखादा चित्रपट खरच चागला असेल तर मग उगीच काहीतरी लिहिण्यात काय अर्थ? आजचा प्रेक्षकवर्ग केवळ सेक्सने बरबटलेलेच चित्रपट पहातो असही नव्हे तर 'कोरा कागज', 'अभिमान' यासारख्या पहिल्या प्रतीच्या चित्रपटाचीही पारख करणारा सुजाण प्रेक्षक आज जिवत आहे. उगीच लिहायच म्हणून काहीतरी लिहून कस चालेल?

'कोरा कागज'मध्ये तरी नको तिथ गाणी नि विनोद टाकलेले नाहीत. चित्रपट म्हटला की 'थोडाफार तरी विनोद आवश्यक वाटतो.

समीक्षकानी प्रेक्षकाच्या रसिकतेविषयी जी कल्पना केली आहे ती अत्यत चुकीची वाटते. कारण सर्वच प्रेक्षक काही 'न्यू व्हेव'चे भोक्ते नाहीत की, नटीच्या शरिराचं मुक्त प्रदर्शन (निदान पडद्यावर तरी!) पहायला जाणारे नाहीत, त्याना वास्तववादी भूमिकेचे चित्रपट हवेच असतात, हे ध्यानात घ्यायला हवे.

समीक्षकाला सदर चित्रपटातल्या काही बावी साचेबद्ध वाटल्याच कशा? आज असा कोणता चित्रपट नाही की त्यात त्याच त्या ठराविक गोष्टी दिसत नाहीत? का त्या साचेवद्ध नव्हेत? सुकेशच्या ठिकाणी विजयआनद आणि अर्चनाच्या ठिकाणी जया भादुरीच शोभली आहे. तिथं अन्य कुणी नटी शोभलीही नसती. अगदी लहान लहान प्रसगातून जयाच्या अगच्या अभिनयसपन्नतेच्या गुणाचे दर्शन घडते. चित्रपटाची एकदर चौकट वास्तववादी आहे हे मान्य करायलाच हवे. चित्रपटातला कोणताही प्रसग घ्या. त्यातून दिग्दर्शकाने वरेच काही सागण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि प्रत्येकाने ती भूमिका प्रत्यक्ष जगली आहे असे म्हटले तर ते चुकीच होणार नाही.

**के. विजय अंबाडे, पुणे**

◻ माझे परीक्षण तुम्ही सपूर्णपणे काळजीपूर्वक वाचल्यास मला वाटते, तुमचा गोंधळ कमी होईल तुमच्या प्रतिक्रियेबद्दल मी तुम्हाला कधीही दोष देणार नाही. कारण कोणत्याही कलेचा परामर्ष घेताना माणसाजवळ जे 'परस्पेक्टिव्ह' असावे लागते ते नसल्याने आपण कुठे आहोत हेच त्या माणसाला कळत नाही. आजूबाजूला काय चालले आहे हे डोळसपणे पाहिल्यास आपण जे पाहिले त्याची आपण आपोआप तुलना करतो त्यातून त्याचा दर्जा ठरवितो. मला वाटते, आपण बगाली चित्रपट 'सात पाके बाधा' हा पाहिला नाही त्या चित्रपटाचा शेवट आणि त्याची हाताळणी वास्तवपूर्ण व पकड घेणारी होती. तसेच त्या चित्रपटातील सुचित्रा सेनचे काम पाहिल्यावर मी जया भादुरीसबधी केलेले विधान तुम्हास पटले असते. आता ह्यावर तुम्ही असे म्हणाल की, आम्हाला खरा बालगधर्व वगैरे माहीत नाही आमच्या गल्लीतला गायकच आमचा बालगधर्व. तर यावद्दल बोलणेच खुटते आता साऱ्याच जणाना असे 'परस्पेक्टिव्ह' येणे शक्य नसते. परतु ज्याना असे आले आहे त्यांनी केवळ मार्गदर्शन केले तर त्यात चुकले काय? ही खराताची मक्तेदारी मुळीच नाही.परतु खरातांना मतस्वातत्र्याचा अधिकार आहे. तो त्यानी योग्य रीतीने वापरला की नाही हे पाहणे हेच सुजाण वाचकाचे काम आहे.

आता तुम्ही हजारो चित्रपट रसिकाबरोबर ९०।९५ टक्के वृत्तपत्राचा हवाला दिला आहे (तुमचा 'खरडणे' हा शब्द धरून). ह्याला उत्तर असे की, 'बॉबी' हा चित्रपट आता ५० सप्ताहाच्या मार्गावर आहे. तो प्रेक्षकानी डोक्यावर घेतला आहे. परतु सुजाण वाचकांना तो कसा वाटला? तसेच रसिक समीक्षकानी त्यातला हिणकसपणा दाखविलेला आहे म्हणजे असेही चित्रपट चालतात तरी त्यातला चागला वाईटपणा कसा ठरवायचा? प्रेक्षकानी! आणि जर प्रेक्षकानीच हे ठरवायचे तर आपल्या चित्रपटकलेच्या विकासाचाही विचार करायला नको का? बॉबीमध्ये अर्धनग्न शरिराचे जे ओगळ प्रदर्शन आहे तेच प्रेक्षकाना आवडते की नाही? असो ह्याविषयी खूप लिहिता येईल.

'असा कोणता चित्रपट......की जो साचेबद्ध नाही?' हे विधान वाचून कोणालाही हसू आल्याशिवाय राहणार नाही.

खरे म्हणजे आता इथेच आटोपते घेतो. परतु माझ्यावर तुम्ही काही आरोप मुद्दाम केले आहेत. एक म्हणजे 'न्यूव्हेव' चित्रपट म्हणजे 'ग्रेट' चित्रपट. व दुसरे म्हणजे शरिराच्या मुक्त प्रदर्शनाचा मी समर्थक आहे. माझ्या आतापर्यंतच्या कोणत्याही लेखात मी जटिल मतप्रदर्शन केले नाही. 'न्यू व्हेव' चित्रपटावरही मी टीका केली आहे. शरिराचे प्रदर्शन मला आवडत असते तर मी सारे हिंदी चित्रपट चवीने पाहिले असते. वास्तव जीवनाशी प्रतारणा न करणाऱ्या चित्रपटांना मी मानतो. मग त्यात अटळ शरीरदर्शन असेल तर मी त्याचे स्वागत करीन. तेव्हा वरील आपली विधाने माझ्याविषयी गैरसमज निर्माण करणारी आहेत मी सौदर्याचा वारकरी आहे जेथे जेथे सौदर्य असेल तेथे तेथे नाचतो. टीका मी विशेष करीत नाही. अगदी नाइलाज झाला तरच करतो. ह्या जगातील सौदर्य कुठे आहे हे मला दाखविता आले तर माझी 'नजर' मी धन्य मानीन. कळावे.

**ह. शि. खरात**

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. २७ जुलै ७४ ते २ ऑगस्ट ७४**

### श्री. चव्हाण यांच्या कर्तृत्वाला नवे वळण

या आठवड्यात यशवंतराव चव्हाण हेच भारतात सर्व थरात चर्चेचे एक केंद्र बनतील. त्यांना रवी या वेळी अनुकूल नाही. पण मंगळ त्यांच्याकडून कौतुकास्पद कामगिरी करून घेणार आहे. त्यांच्यावर लोकसभेत टीका होईल पण ते लोकसभेत आपला ठसा उमटवल्याखेरीज राहाणार नाहीत. आर्थिक क्षेत्रात खुद्द पंतप्रधान जरी खास लक्ष टाकीत असल्या तरी त्या व यशवंतराव अधिक जवळ येतील. केंद्रस्थानी मंत्र्यांच्या खाते बदलाला चालना मिळेल. विरोधी पक्षांना फाटाफुटीचा धक्का. महाराष्ट्रात राजकारणात खळबळ माजेल.

**मेष : पैशाची अभिवृद्धी**

आठव्या चंद्राने आठवड्याची सुरुवात होत असून ती शुभदायक आहे. दि. ३१ रोजी मिथून राशीतील शुक्र-शनी युतीपासून सर्व क्षेत्रातील आर्थिक अडचणी दूर होऊ लागतील. रेस, लॉटरी अगर संसारातील संपत्तीचा वारसा मिळून आर्थिक समृद्धी प्राप्त होईल. मित्र अगर श्रीमंत धनिकाकडून उद्योगासाठी अर्थसाहाय्य मिळेल. शेती, शेतीची अवजारे, खते, प्लॅस्टिक, तांदूळ याचा धंदा सुरू करा. जमीन अगर घर विकत घ्यायला २८ ते ३१ हा काळ शुभदायक आहे. नोकरीत बढती मिळून बदली होईल. लेखकांच्या साहित्याला मागणी येईल. तब्येत सुधारेल. **महिलांस :** पदवीधर स्त्रियांना नोकरी सहज मिळेल. घरगुती उद्योगात प्रगती.

**वृषभ : जागा मिळेल**

तुमची शुक्र धर्माची रास आहे. सातवा चंद्र आठवड्याच्या सुरुवातीस तुम्हाला प्रेमात गुंतवून त्याचप्रमाणे संसारात गोडवा निर्माण करून तुमच्या जीवनाला 'गुलाबी बहर' आणील. दि. ३१ ते ३ ऑगस्ट या दिवसांची नोंद घ्या. जमीन व राहत्या जागेच्या संबंधात अनेक अपेक्षा पूर्ण होतील. पैशाची परिस्थिती तशी वाईट राहणार नाही. परंतु मिळकत व खर्च यात सुसंगती राहाणे कठीण. हौस व चैन यासाठी हात सोडून खर्च होईल. प्रवासाचा बेत तडीस जाईल. मित्रांचे सहकार्य मिळेल. नोकरी नसणाऱ्यांना नोकरी मिळेल. चालू नोकरीत त्रास कमी होईल. **महिलांस :** हौसेसारखी वस्तू खरेदी करू शकाल. पैसाही मिळेल.

**मिथून : स्वप्ने साकारतील**

या आठवड्यातील दि. ३१ जुलैच्या शुक्र-शनी युतीपासून तुमच्या जीवनात व व्यावसायिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण घटना घडून उराशी बाळगलेली स्वप्ने साकारू लागतील. दि. २८ ते ३१ जुलै चंद्राची तुम्हाला अनुकूलता लाभत आहे. राजकारणात एकदम मोठे स्थान मिळेल. प्रतिष्ठा व दर्जा वाढेल. वकील, डॉक्टर, लेखक व व्यापारी यांचे सरकार दरबारी वजन वाढेल. आर्थिक स्थिती सुधारू लागेल. बँक क्षेत्रात नोकरी करणाऱ्या या राशीच्या लोकांना लाभदायक असे काही तरी घडेल. नोकरीत बदली व पगारवाढ होईल. परदेशी **प्रवासाचाही योग** आहे. कागदव्यापार करणाऱ्यांनी कायद्याविरुद्ध वागू नये. **महिलांस :** संसारात शुभघटना. पुत्रजन्माचा आनंद मिळेल. गोड पत्र येईल.

**कर्क : उपासना करा**

तुम्हाला या आठवड्यात रवी व मंगळ अनुकूल आहेत. तुमचे सारे नवे उद्योग दि. ३१ पूर्वी आटपा. दि. २ ऑगस्ट हा दिवस अनुकूल आहे. त्यादिवशी कोल्हापूरच्या अंबाबाईची उपासना करा. व शुक्रवारचा उपास करा. मिथून राशीत व्ययस्थ शनी-शुक्राची युती दि. ३१ रोजी होणार आहे. स्वतःचे मन शांत ठेवा. स्त्री मोह टाळा, वासना काबूत ठेवा व व्यसनी मित्रापासून सावध राहा. अशा लोकांना पैशाची वा इतर मदत करू नका. परीक्षेत पास होण्यासाठी मन शुद्ध ठेवा. वरिष्ठांच्या अगर मालकांच्या मनात स्वतःबद्दल गैरसमज निर्माण होऊ देऊ नका. **महिलांस :** मन चिंतनात गुंतवा. वाचन करा. नोकरीत काळजी घ्या.

**सिंह : अपेक्षित यश**

या आठवड्यातील सोमवार ते गुरुवार हे दिवस जास्त अनुकूल आहेत. चंद्र अनुकूल आहे. राजकारणातील तुमच्या वाट्याला आलेली उपेक्षा संपेल. एखादे महत्त्वाचे पद पदरी पडेल. खासदार अगर आमदार असल्यास हा आठवडा दर्जा व प्रतिष्ठा वाढवणारा ठरेल. इंजिनियर, डॉक्टर कृषी पदवीधर व वाणिज्य पदवीधर यांना नोकरी कायम मिळेल. व्यापार असल्यास सध्या धाडस नको. पडून राहिलेल्या मालाला मागणी येईल. शेअरचा उद्योग करू नका. कर्जाचा विचार तूर्त नको. चालू भांड्यांचा कारखाना अगर शेतीमालाचा धंदा असल्यास लाभ होईल. **महिलांस :** घरबसल्या कापड उद्योग करा. पैसा मिळेल. तीर्थयात्राही घडेल.

**कन्या : खर्च टाळा**

रवी आकरावा आहे तर मंगळ बारावा झाला आहे. दि. ३१ जुलैला शुक्र-शनी युती दशमस्थानी झाली आहे. हे सारे ग्रहमान तसे वाईट नाही. प्रतीकूलदेखील नाही, पण

खर्चाचा मोह अनेक प्रकारे होणार आहे. तो खर्च अवश्य टाळा.. तूर्त कापड खरेदीच्या भानगडीत पडू नका. नोकरीची स्थिती एकदरीत अनुकूल राहील. पण एखाद्या जुन्या प्रकरणाची डोकेदुखी निर्माण होईल. वरिष्ठाची मर्जी राहील पण नाराजीही राहील. तब्येत देखील सुधारल्याचा अनुभव येईल. बेकाराना काम मिळेल. **महिलांस** : आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेणे सध्या आवश्यक आहे. नोकरीत उत्तम.

## तूळ : कुटुंबात आनंद

आठवड्याची सुरुवातच दुसरा चद्र असताना होत आहे. कुटुबात एखादी शुभघटना घडून येण्याची शक्यता आहे. पत्नी गरोदर असेल तर व प्रसूतीयोग्य असेल तर पुत्रसुखाचा आनद मिळणार आहे. दि. ३१ च्या भाग्यस्थानी झालेल्या शुक्र-शनी युतीने तुमच्यापैकी अनेक भाग्यवताचे कलावत बनण्याचे स्वप्न पुरे होईल. शनिवार ते मगळवार या दिवशी बेकाराना नोकरी मिळेल स्वतंत्र उद्योग करावयाचा असल्यास अपेक्षित पैसा व तात्रिक साहित्याचा लाभ होईल. पुष्कळ दिवस न भेटलेले मुलगे भेटतील. पैशाची परिस्थिती सुधारेल. **महिलांस** : माहेरच्या माणसाचे प्रेम लाभेल. आईची माया मिळेल

## वृश्चिक : लॉटरीत यश

आता तुम्ही बाराव्या हर्शलाची मुळीच काळजी करू नका. त्याची उग्रता हळू हळू कमी होत आहेच. चंद्रावर तुमच्या राशीत राहू आहे आणि या आठवड्याला चद्र पहिला, दुसरा व तिसरा आहे सिंह राशीत दशम या व्यवसायात मगळासारखा तुमच्या राशीचा समर्थ ग्रह येऊन बसला आहे. साराश हा आठवडा तुम्हाला यश, धनप्राप्ती, औद्योगिक प्रगती आणि स्वास्थ्य देणार आहे. तुम्ही लॉटरीची तिकिटे काढीत असाल तर यावेळी तुम्ही बक्षिसाचे मानकरी बनण्याची बरीच शक्यता आहे. नोकरीत महत्त्वाच्या जागेवर नेमणूक. **महिलांस** : तुम्हाला यश देणारा हा आठवडा आहे. धनलाभाचा योग.

## धनू : सुटकेचा आनंद

पहिले दोन दिवस चद्र फारसा अनुकूल नाही. त्यामुळे पैशाची वा इतर आश्वासने कुणाला देऊ नका. नतर मात्र सबध आठवडा अतिशय महत्त्वाचा व यशाचा आहे. सप्तमस्थानी दि ३१ ची शुक्र-शनी युती ससारात थोडे स्वास्थ्य निर्माण करील विवाहेच्छूंचे *विवाह या वेळी ठरावेत. नवरा-बायकोची* घटस्फोटापर्यंत चिघळलेली प्रकरणे तडजोडीने मिटतील. आठवा, मगळ तुम्हाला छळीत होता. तब्येत नादुरूस्त ठेवीत होता तो आता भाग्यस्थानी बसून तुमचे व्यावसायिक व राजकीय जीवन उचावील. **महिलांस** : सार्वजनिक कार्यात मान मिळेल. राजकीय यशही मिळेल.

## मकर : जमिनीची प्राप्ती

आठवड्याची सुरुवात अनुकूल चद्राने होत आहे. रवी जरी सातवा असला व तो जरी ससारात थोडीबहुत कटुता निर्माण करणार असला तरी एकदरीत सारा आठवडा अपेक्षापूर्ती करणारा आहे. जमीन, घर, वारसातील सपत्ती याचे वाद चालू असतील तर ते या वेळी तुमच्या बाजूने निकाली निघतील. तुम्हाला जमीन मिळेल. एखादा प्लॉट, बगलादेखील खरेदी करू शकाल. या वेळी तुम्हाला परदेशी प्रवासाचा जोरदार योग आहे. पत्रकार, जमीनदार, बडे बागाईतदार, शेती अवजाराचे व खताचे कारखानदार यांना असा योग आहे. **महिलांस** : माहेरची सपत्ती मिळेल. यात्रेच्या निमित्ताने प्रवास घडेल.

## कुंभ : संघर्षातून यश

रवी सहावा आहे तर मगळ सातवा आहे. सारी मदार आहे ती शनीवर. दि. ३१ रोजी शुक्र-शनीची पचमस्थानी होणारी युती बरेच काही देऊन जाईल राजकारणात तुम्हाला अकारण व सकारण विरोध होईल. पण शेवटी तुम्ही जिंकाल व अपेक्षित प्रतिष्ठेचे पद पदरी पडेल. तुम्ही सत्तारूढ पक्षाचे खासदार वा आमदार असाल तर तुम्हाला शासनात मोठे स्थान मिळणार आहे. तसा विचार चालू होईल. आर्थिक प्राप्ती सर्वसाधारण उत्तम राहील. चालू उद्योगात भाडवल मिळेल. नवा उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने वातावरण अनुकूल होईल **महिलांस** : नोकरीत प्रमोशनचा उत्तम योग आहे.

## मीन : विरोधक नरमतील

मंगळासारखा प्रबल व समर्थ ग्रह शत्रूस्थानी असणे ही एकच गोष्ट तुमच्या वर्चस्वाची विरोधकाना प्रचीती आणून देणारी ठरेल. नोकरी, उद्योग, राजकारण वगैरे कोणतेही क्षेत्र असो, त्यात तुम्हाला विरोध करण्याची कुणालाच छाती होणार नाही. नोकरीत पगारवाढ, प्रमोशनचे प्रयत्न यशस्वी होतील. 'साहेब' सहानुभूतीने वागेल. कोर्टकामाचा निकाल अनुकूल लागेल. लेखकाच्या साहित्याला मागणी येईल. ईश्वरी उपासनेची इच्छा होईल पण ती पुरी होणे कठीण. लेखी करार करू नका. नोकरीत वरिष्ठाबद्दल वाईट बोलू नका. **महिलांस** : मोठेपणाची स्पर्धा करू नका. स्वत च्या कामात दक्ष रहा.

□ □


फुकट फुकट फुकट

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पांढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

## योगिनी-वियोगिनी : पृष्ठ ७ वरून

अन् मग एके दिवशी युद्धभूमिवरून पत्र आले, 'आत्या तुला आठवत का, ...यास्नायाला असताना तू मला नेहमी कादवरी लिहायला सागायचीस ! आठवत ? आता मी तो तुझा उपदेश प्रत्यक्षात आणायचे ठरविले आहे... मी जे लिहितो आहे ते कधी-काळी तरी प्रसिद्ध होईल की नाही, हे मला सागता यायच नाही. पण ते लिहाताना मला अपूर्व आनद होत आहे. अन् या लिखाणात मी इतका गुतून गेलो आहे, की ते काम सोडून देणे आता मला शक्य नाही.

हे उद्गार 'शैशव' या पहिल्या कादबरीच्या सदर्भातले— कादवरी प्रसिद्ध झाली. तिचा खूप बोलबाला झाला. अनेक पट्टीच्या टीकाकारानी शाबासकी दिली. त्या सर्व अभिप्राया-पेक्षा आत्याच्या उत्स्फूर्त कौतुकाचे शब्द लिओला लाख मोलाचे वाटले. तिने आपल्या लाडक्या लिओस लिहिले, 'बघ ! साहित्य-निर्मितीचा तू अगदी अगत्याने विचार करावास अस नव्हते का मी सांगत ? या क्षेत्रात तुला उत्तम यश मिळेल, असे मी आधीच नव्हते सागितले ? उत्तम लेखक होण्यास आवश्यक असे सर्व गुण तुझ्या अगात आहेत. बुद्धिमत्ता, कल्पनाशक्ती आणि उदात्त भावना... सगळेच तुझ्यापाशी आहे !'

आणि मग १८५४ च्या फेब्रुवारीत जेव्हा लिओ सुट्टीवर घरी परतला, तेव्हा आत्या 'पसरोनी बाहु कवळण्या उरी' अशी दारा-तच उभी होती. लिओच्या बलदड मिठीत तिची शुष्क कुडी निर्भर-मनाने विसावली. नसानसातून प्रेम आणि वात्सल्य उसळत होते... लिओला कुठे ठेवू अन् कुठे नाही, अशी त्या म्हातारीची स्थिती ! लिओमात्र आत्याने स्वत च्या प्रकृतीकडे लक्ष न दिल्याने नाराज होता. तिने असे का दुर्लक्ष करावे ? मी हा इथे ठाम उभा अस-ताना, तिने हलगर्जी करायची म्हणजे काय ? मरणाची भाषा काढा-यचा तिला काही अधिकार नव्हता ! उत्साहाने मुसमुसलेला, प्रकृ-तीने ठणठणीत असलेला लिओ तिच्या समोर नजरेस नजर देऊन उभा होता ! जगण्याचे महत्त्व पटवून देत होता. मोठी लोकविलक्षण जोडी होती ती ! धगधगणारे तारुण्य— अन्— विमनस्क विरक्ती घरी आल्यावर लिओ अयोग्य वागला, की म्हातारीची पुटपुट सुरू होई. ...हल्ली लिओच्कानं अगदी ताळतत्र सोडलय... माझ म्हातारीच कोण ऐकतय् ! किती सांगाव ?... अरे जरा साभाळून रहात जारे ! कशाला त्या पोरीबाळीच्या नादी लागतोस ?' आत्याची पुटपुट सुरू असायची. पण रागावून, दरडावून बोलणे तिला जमले नाही. कारण लिवोच्का चुकला, वाईट वागला, तरी मुळात तो चागला आहे, सत्प्रवृत्त आहे ही तिची अविचल श्रद्धा ! पुढे क्रिमियन युद्ध सुरू झाले. टॉलस्टॉय ऐन रणधुमाळीत होता. आघाडीवर तोफा धडाडत होत्या. आत्याची घरी झोप उडाली होती. त्या रुद्रभीपण रणभूमीवरून तो हातीपायी सुखरूप आला तेव्हा आत्याला परब्रह्म गवसल्याचा आनद झाला.

लिओ टॉलस्टॉय आणि त्याची आत्या ही जोडी मोठी विलक्षण होती. अतर ४०–४२ वर्षांचे ! ती त्याची आई होती तशीच किंचि-तशी प्रेयसीसुद्धा होती. क्वचित रूसणेफुगणे चाले... जीव ओतून प्रम करायलाही त्या दोघाना एकमेकाचीच गरज असायची. मन-मोकळे करायला आत्यासारखे विश्रातिस्थान कुठेही नव्हतें. प्राणा-हुनही प्रीय वाटावीत अशी दोनच माणसे लिओ मानीत होता. एक आत्या, अन् दुसरी व्यक्ती म्हणजे मोठा भाऊ— निकोलस.

टॉलस्टॉय क्रिमियाहून परतल्यावर त्याच्या डोक्यात एक नवेच खूळ (?) आले. गुलामाची मुक्तता ! तथापी असले विचार आत्याला अभिजात मूर्खपणाचे वाटत. गुलामाना का म्हणून स्वातत्र्य द्यायचे ? त्याचा साभाळ करणे हे परमेश्वराने सागितलेले नैतिक कर्तव्य आहे. ते कसे टाळता येईल ?— ही तिची सनातनी भूमिका ! टॉलस्टॉय त्याच्या स्वातत्र्याची आवश्यकता तिला परोपरीने पटवून देई. पण खुद्द गुलामानाच जिथे मुक्ती योजना पटत नव्हती, तिथे आत्याला ती कशी पटावी ? अखेर त्याने दैनदिनीत लिहिले, 'आत्या अतिशय प्रेमळ असली तरी आता मला तिच्याविषयी तिर-स्कार वाटायला लागला आहे !' व्हॅलेरियाशी लग्न करण्याच्या बाबतीत टॉलस्टॉय टाळाटाळ करीत होता. आपला हा शहाणा भाचा असा विचित्रपणा का करतो आहे तेच तिला समजत नव्हते. इतकी चागली मुलगी हातची घालवली, तर पुढे पश्चात्ताप होईल ही तिला धास्ती वाटत होती... ती भाच्याचे मन वळवीत होती. रोज सध्याकाळी तो आत्याची चौकशी करायला तिच्यापाशी थोडा वेळ बसत असे. तिची आपली शिवणाच्या पेटीत खुडबुड चाललेली असायची. व्हॅलेरियाचा विषय स्पष्टपणे काढता आला नाही, की इतर काहीबाही विचारत रहायची. एकदा तिने विचारले, 'काय रे लिवोचका, तारेने शब्द कसे जातात बर ?' मग हे भाचेराव सारे स्पष्ट करून सांगायला लागले. टॉलस्टॉय ह्याडाचा शिक्षकच होता ! आत्या जिज्ञासू होती. तरीही तारेने सदेश पाठविण्याचे विज्ञानातले अबोल रहस्य म्हातारीच्या आकलनकक्षेच्या पलीकडचे होते. सारे ऐकून घेतल्यावर ती म्हणाली, 'हे सारं विचित्रच दिसतय् ! मघा मी चागली तासभर त्या तारेच्या खाबावरून निघालेल्या तारेवर नजर खिळवून उभी होते. पण एकही शब्द मला त्या तारेवरून जाताना दिसला नाही तो ?'

टॉलस्टॉयचा मोठा भाऊ निकोलस तरुणपणीच क्षयाने निवर्तला आणि मग आत्या हीच एकमेव जिवाभावाची व्यक्ती ठरली. आपल्या उनाड, स्वच्छदी, विमुक्त जीवनाचे सारे बरेवाईट पापुद्रे टॉलस्टॉय आत्याजवळ उलगडीत असे. तो कुठेही असला, तरी आत्याच्या जीवावर सारी जबाबदारी टाकून निर्वेध रहात असे. ती सारे घरचे खटले साभाळायची. असख्य गुलाम, जमीनदारी, तदनुषगिक व्यव-साय—हे सारे चक्र सुरळीत चालू ठेवणे म्हणजे एक स्वतत्र कामच होते त्यासाठी गृहस्वामिनी आणावी हा तिचा लकडा. मध्येच टॉलस्टॉयने गावच्या मुलाना शिकविण्यासाठी घरात शाळा काढली. त्यावर तिचे लक्ष असे तो परदेशी गेला, तेव्हा राजद्रोहाच्या सशयाने त्याच्या घराची सरकारने झडती घेतली. आत्या धावरून एवढीशी बनून गेली. टॉलस्टॉयला झडती घेतल्याचे कळताच सर-कारचा जितका सताप आला, तितकीच आत्याची काळजी वाटली. तिच्यासाठी हातातले काम टाकून शेकडो मैलावरून तो धावत आला.

आपल्या लाडक्या लिवोचकाला छानशी बायको मिळावी ही आत्याची आस. टॉलस्टॉयही लग्नासाठी अक्षरश: अधीर झालेला होता. अखेर ३४ व्या वर्षी त्याने सोफाया आँड्रीव्हॅना वर्स हिच्याशी लग्न केले. आत्याची काळजी मिटली नववधूचे तिने स्वागत केले दारातच पवित्र क्रॉस घेऊन उभी होती ती सुनेने गृहप्रवेश केल्यावर आत्या निवृत्त झाली. सोन्याच्या (टॉलस्टॉयची पत्नी) कर्तबगारीचा आवाका समजल्यावरतर आत्या अगदीच 'पेन्शनीत निघाली' स्वखुषीने! नवी नवरी १८वर्षांची–आत्या सत्तरीला आलेली दोघीना फार वेळ गप्पा मारणे जमत नव्हते जीवनाच्या दोन ध्रुवावर दोघी वावरत होत्या आत्याचे डोळे पैलतीरावर खिळले होते सोन्या तारुण्याने अन् उत्साहाने मुसमुसलेली, तर आत्याच्या उत्साहाच्या ज्योती विझू लागलेल्या. तशाही स्थितीत ती सुनेला माया देत होती टॉलस्टॉयच्या मुलांना जवळ करीत होती.

आत्याला दीर्घायुष्य लाभले होते. 'युद्ध आणि शाती'चे लेखन तिच्या हयातीत पुरे झाले. तिचा 'लिवोच्का' साहित्यप्रभू झाल्याचे तिने पाहिले निरासक्त योगिनीचे हे एक स्वप्न तरी प्रत्यक्षात आले! वयावरोबर थकत थकत गेली तिच्याबरोबर तिची म्हातारी सखी नटाल्या पेट्रोव्हॅना नेहमी सोबतीला असे आत्यासाठी टॉलस्टॉयने एक प्रशस्त हवेशीर खोली दिलेली होती. त्यात त्या दोघीची ऊठबस चालत असे. आत्याच्या अगात अगदी शक्ती नव्हती. नातवंडाना–टॉलस्टॉयच्या मुलाना घेववत नसे. तरीही निकोलसच्या नातवडात तिचा जीव अडकलेला असायचा. मुलानी आपल्यापाशी यावे म्हणून ती नाना युक्त्या योजीत असे. खाऊचे आमीष दाखवी. पण पोरे तिच्या थरथरत्या हातातून खाऊ घेत अन् जराही न रेंगाळता बाहेर सटकून जात...काही दिवसानी आत्याच्या मैत्रिणीचे पिकले पान गळून पडले ती अगदी एकटी उरली टॉलस्टॉयने आत्याचे सारे काम करण्यासाठी, तिची सेवा-सुश्रुषा करण्यासाठी एक परिचारिका नेमली. पण आत्याला भारी एकटे एकटे वाटायचे. निकोलसची आठवण काढण्याव्यतिरिक्त दुसरा विरगुळा नव्हता

मग टॉलस्टॉयने एक शिस्त घालून दिली. रोज सर्जीने (मोठा मुलगा) आत्यापाशी येऊन बसायचे अन् तिला हलके फुलके काही तरी वाचून दाखवायचे. सर्जी तो नियम पाळीत असे. एके दिवशी तो पुश्किनच्या बेल्किन्स टेल्स वाचून दाखवीत होता ऐकता ऐकता आत्याचा डोळा लागला सर्जीने पुस्तक पालथे घातले अन् तो बाहेर सटकला. सध्याकाळी टॉलस्टॉय आत्याजवळ आला आणि चिरजीव काय वाचून दाखवीत होता, ते त्याने पाहिले...ते पुस्तक चाळता चाळता त्याचे लक्ष एका कथेच्या सुरुवातीच्या वाक्यावर खिळून राहिले. ती सुरुवात टॉलस्टॉयला अत्यत कलात्मक वाटली. कथावस्तूला इतका झटकन हात घालण्याचे पुश्किनचे कौशल्य त्याला अनुकरणीय वाटले...आणि तावडतोब त्याने अभ्यासिकेत जाऊन कादबरी लेखनास सुरुवात केली. तीच जागतिक कीर्तीची कादबरी– ॲना कॅरोनिना.'

आत्या आता ८० च्या आसपास आली होती. सारे अवयव थकत चालले होते. दृष्टी मदावली, ऐकायला येत नसे. आठवण राहात नसे. पण तशाही स्थितीत तिच्या हृदयाच्या गाभाऱ्यात निकोलस्ची मूर्ती होती. ती योगिनी जन्मभर वियोगिनी होती...तरीही पहिल्या प्रेरणा जपत होती. त्या वयोवृद्ध योगिनीच्या तोडून 'निकोलस्' अशी हाक येई टॉलस्टॉय चौकशीसाठी जवळ आला. तिच्या दतहीन तोडातून अर्धीबोबडी हाक येई 'नि...को...लस्!' तिचा तो थरथरणारा शब्द ऐकला की टॉलस्टॉय अस्वस्थ होई. हृदयाला पीळ पडे. निकोलस्च्या मृत्यूला ४५ वर्षे झाली होती...तरी निकोलस्! त्याच्याशी विवाह झालेला नव्हता...तरीही त्याची अनन्य भक्ती! मन त्या ठायी गुतलेले होते. या योगिनीने इतके दिवस वडिलाच्या स्मृतीची कल्पवेल मनात जोपासलेली पाहून टॉलस्टॉय विस्मयचकित होई. एक अविवाहित सावित्री मनाने वरलेल्या सत्यवानासाठी आमरण झुरत राहाते! त्या अपार निष्ठेने टॉलस्टॉयचे कलावत मन अस्वस्थ होई...टॉलस्टॉय जवळ आला, की ती त्याला वडिलाच्या नावाने हाक मारी... जे काय चार दोन शब्द बोले, ते वडिलाविषयीच असत मरणाच्या दारात पाऊल टाकल्यावरही अभग राहिलेली अनाघ्रात प्रीती निश्चितच जगावेगळी होती त्या दर्शनाने टॉलस्टॉयचे कलावत मन उन्मळून जात असे. मग तिच्याशी काहीही बोलणे त्याला सुधारतच नसे अखेर त्याने आत्याला भेटायला यायचेच बद करून टाकले.

मग एक दिवस आत्याने टॉलस्टॉयला मुद्दाम निरोप धाडून बोलावून घेतले तो आला, तेव्हा ती म्हणाली, 'लिओव्का, अरे ही माझी खोली फार छान आहे रे!–किती हवेशीर–किती मोठी...!

'आहे ना? आवडली ना तुला? मुद्दामच तुला या मोकळचा, हवेशीर खोलीत ठेवलय्! इथे बरे वाटते ना तुला?'

'बरे वाटते! पण लिवोच्का मला इथून हलव तळमजल्यावरच्या–वापरात नसलेल्या खोलीत ठेवून दे.'

'अस का म्हणतेस आत्या?'

'अरे, ही खोली चागली आहे मी इथेच गेले, म्हणजे मग ही खोली वापरायला तुम्हाला प्रशस्त नाही वाटायच! म्हणून म्हणते ..'

आत्याची विनती लवकरच मान्य करावी लागली. तिला खाली आणल्यावरही तिच्या थरथरत्या ओठावर निकोलस्चे नावच रेंगाळत असे. २० जून १९७४ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी तिने देह ठेवला. मातृनिधनाच्या यातना काय असतात, ते टॉलस्टॉयला तेव्हा समजले अखेर अखेर तिच्याशी तुटकपणे वागल्याचा त्याला भारी पश्चात्ताप होई पण त्या चिरवियोगिनीचा ध्यास त्याला पिळवटून टाकीत असे! बघवत नसे! त्या वियोगिनीने निकोलस्वर विलक्षण उत्कट प्रेम केले होते. मनोभग धारिष्ट्याने सहन केला होता. त्याच्या मुलाच्या ठायी त्याची प्रतिमा पाहिली होती. अन् मुलांच्या आईला दिलेले वचन पाळण्यासाठी त्याच निकोलस्शी विवाह केला नाही! केवढी निष्ठा! लग्न झालेले नसूनही सर्वस्व सतर्पण! दूरच्या अप्राप्य मैत्रीच्या स्वप्नावरच ही योगिनी जगली. तिच्या निष्ठेची असीम गहनता टॉलस्टॉयला नेहमीच विस्मित करीत असे. अशा निष्ठावान, सोशीक आणि स्वप्नजीवी योगिनी स्त्रीजीवनाला केवढे गहन परिणाम देऊन जातात!

□ □



# शर्मिला

## एक जबरदस्त कमबॅक

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

एकूण शर्मिलाने आयुष्यात एकदा चूक केलीच. 'आविष्कार' हे चित्र चांगले असल्याचा तिचा दावा होता तो चूक ठरला. शर्मिला एरवी आपल्या चित्रपटाविषयी क्वचितच बोलते. किंबहुना ज्या सिनेमामध्ये तिने भूमिका केलेली असेल तो सिनेमाही ती पहात नाही. ती ज्या वेळी एखाद्या चित्रातील आपल्या भूमिकेविषयी कुणाशी बोलू लागे, त्या वेळी लोक समजत असत की हे चित्र खास आहे. म्हणूनच शर्मिला या चित्राविषयी बोलते आहे. ज्या वेळी 'आराधना' चित्र तयार झाले त्या वेळी ती 'आराधना'विषयी अशीच बोलत होती. 'आराधना' हे चित्र तिच्या भूमिकेमुळे आणि राजेशच्या हिरोगिरीमुळे गाजले. त्यानंतर ती असेच 'अमर प्रेम'

विषयी बोलत होती. त्यातही तिने विलक्षण जान ओतून आपली भूमिका निभावली होती. आणि ते चित्र 'आराधना'च्या तुलनेने चालले नाही तरीही, त्या चित्रातील बंगाली जसबाती साधेपणा आणि गोडवा यामुळे ते आराधनामधल्या नुसत्या रोमँटिक मूडवाल्या चित्रापेक्षाही सरस ठरले.

अर्थात ती 'तलाश' या चित्रामधल्या आपल्या भूमिकेविषयी कधी काही बोलली नाही. 'पाप–पुण्य'विषयी काही बोलली नाही. कारण, ही चित्रे कशी आहेत आणि त्यातील आपल्या भूमिका कशा आहेत ते तिला ठाऊक होते.

'आविष्कार' हे चित्र तसे बकवास असले तरी शर्मिलाच्या भूमिकेविषयी तसे म्हणता येणार नाही. आविष्कारमध्ये शर्मिला ग्रेट होती. हिंदी पिक्चरमध्ये एखादी जबरदस्त अदाकारी पाहायला मिळणे एरवी मुष्किलच. वर्षभर चार-पाचशे चित्रे पाहावीत आणि त्यात, दोन-चार चित्रपटात चांगली जबरदस्त अदाकारी पाहल्याचे समाधान मिळावे. या वर्षी पाहलेल्या चित्रात राखी (पगली), जया भादुरी (कोरा कागज) आणि 'आविष्कार'मध्ये शर्मिला यांचीच अदाकारी लक्षात राहील.

शर्मिला तशी अभिनयात कधीच उणी पडली नव्हती–पडणं शक्य नव्हतं. मालिक, राजा-राणी किंवा अशाच पडल पिक्चर्समध्ये जरी आपण तिची कामे पाहली तरी, ती एखाद्याच प्रसंगात आपल्याला अदाकारीची जी चुणुक दाखवायची की जाणकाराला वाटावे, 'ठीक आहे.' पिक्चर बकवास असले, तरी शर्मिला तर होती. परवाच्या 'पाप और पुण्य'चीच गोष्ट घ्या. या पिक्चरमध्ये तिला तसे खास काम नव्हते. पण ती राजपुत्र शशी कपूरपुढे नाचगाणे करण्यासाठी येते. तिचा प्रियकर शशी कपूर तिला ओळखीत नाही. त्यामुळे ती कडाडून चरफडून आणि मोहब्बत भराने ी, 'मैं गोधपूर की जग्नू' हे गाणे पेश करते. एवढे गाणे पाहल्यावर शर्मिला पाहल्याचे खूप समाधान मिळते. शर्मिलाला कोणी 'डान्सर' म्हणून मानल्याचे मला माहीत नाही. पण ती नृत्य पेश करताना अशी काही त्या नाचात जान भरते की पहात रहावं. 'तलाश'मधला 'झुनली रात मां' हे गाणं या तिच्या नृत्यासाठीच पहावं.



एस्. एन्. जैन यांच्या 'धूप छांव'च्या सेटवर संजीव कुमार, हेमा मालिनी, कमल कपूर आणि कम्मो. फिनान्सचे 'धूप' संपून चित्रीकरणाचा 'छांव' सुरू झाला.

गालाची खळी, मासोळीसारखे डोळे, अत्यंत किसेबल ओठ आणि सेक्सी स्मित कोवळघा, लवचिक लतेची नजातक असलेली तब्येत आणि अत्यंत ऋजू काळजाला हात घालणारी डायलॉगची स्टाईल यामुळे शर्मिला 'आराधना'च्या काळात टॉपला जाऊन पोहोचली होती. त्याच काळात मन्सुरअली मात्र क्रिकेटच्या क्षेत्रात खालच्या पायरीला जाऊन पोहोचला. पण तिला मुमताझ आणि हेमामालिनी या अधिक सेक्सी आणि फ्रेश चेहेऱ्याच्या अदाकारांनी मागे हटवले. यावेळी तिने 'माणिक', 'सुहाना सफर', 'हमसफर' सारख्या चुकीच्याच चित्रपटात कामे केली. (हीच चूक पुढे मुमताझनेही केली. हेमा मात्र थोडक्यात बचावली.) राजेशबरोबर 'आराधना'मध्ये जोडी जमली म्हणून तिची प्रत्येक चित्रात जोडी जमविण्याच्या निर्मात्याच्या प्रयत्नाला बळी पडली. राजेशच्या अदाकारीच्या स्टाईल आता बाश्या होत चालल्या होत्या आणि प्रत्येक चित्रपटात वाव असो व नसो, आपल्या एकटीच्या अदाकारीवर यशस्वी करणे, तिच्या शक्यतेच्या बाहेरचे होते. राजेशविषयी प्रेक्षकामध्ये कमालीची अॅलर्जी दिसून येऊ लागली. 'सफर' या चित्रामध्ये राजेश-शर्मिलामधल्या असफल प्रेमावरही आमचे पब्लिक खूश होते पण, 'माणिक' किंवा 'राजा-राणी'मध्ये लोक राजेशला पाहायलाही तयार नव्हते आणि शर्मिला या प्रतिक्रियेची दुर्दैवी बळी होती. शर्मिलाची पिक्चर्स आता पब्लिक पाहाणारच नाही की काय अशी भीती वाटू लागली होती. शर्मिला आता जून झाली असेही लोक बोलू लागले होते. बिमल रॉय प्रॉड. च्या 'चैताली' या चित्रामध्ये हृषिदासारख्या बुजुर्ग दिग्दर्शकाने शर्मिलाचा रोल सायराला देऊन सायरा ही एक श्रेष्ठ अभिनेत्री आहे असे म्हणावे म्हणजे शर्मिलाच्या अदाकार म्हणून बेइज्जतीचा कळस होता. (मजा अशी याच वेळी मन्सुरअली मात्र भारतीय क्रिकेटमध्ये बऱ्याच पायऱ्या चढून वरच्या श्रेणीत जाऊन बसला होता.) शर्मिलाला हृषिदांचे हे वागणे इतके झोंबले की ती म्हणाली हेमा मालिनी किंवा झीनतने माझी जागा घेतली असती तर मी काही म्हटले नसते. त्या आज धंद्यात टॉपला आहेत, पण सायराने? आणि हृषिदानी तिला अदाकार ठरवावे.

दरम्यान शर्मिला आणि शशीचे 'आ गले लग जा' चालले. खरे म्हणजे ते चित्र होते, शशी, शत्रुघ्न सिन्हा आणि मा. टिटोचे. पण म्हणतात ना, कामयाबीसारखे दुसरे काही नसते. पूर्वी जी शर्मिला जून दिसत होती, तीच आता आपली तब्येत सांभाळणारी ठरली. एवढेच नव्हे तर सायराबानूकडे असलेला एक रोलही तिला मिळाला 'आविष्कार'नंतर शर्मिलाच्या अदाकारीचाही सवाल उरला नाही. ज्याने ज्याने आविष्कार पाहलाय, तो तो तिची एकच अदाकारी जिभेवर घोळवत निघालाय, राजेशच्या तोंडातली सिगारेट काय उडवते शर्मिला—जवाब नही. पण मला शर्मिलाची आणखी एक याद येते. ती बाथरूममध्ये राजेशला ओढते त्यावेळचा प्रसंग. काय बाई दिसते त्यावेळी रसरशीत!

शर्मिला परत चित्रपटसृष्टीत आली. मन्सुरअलीने क्रिकेटमध्ये पुन्हा आपले स्थान मिळविण्याइतकाच दिलासा मिळाला त्यामुळे. ◻

# धूप संपले. छाँव सुरू झाली

हेमा मालिनी आणि संजीवकुमार यांचे प्रेमप्रकरण बिनसल्यामुळे त्यांच्यामधून विस्तव जाणार नाही ही एक समजूत होती. त्यामुळेच हेमा मालिनी आणि संजीवकुमार हे हिरो-हिरॉईन असलेले पिक्चर कधी पूर्ण होऊ शकेल असे कुणाला वाटले नाही. इतक्यात 'धूप-छाँव'चे चित्रीकरण हॉटेल किंग्ज इंटर नॅशनलमध्ये सुरू झाले. निर्माते एस्. एन्. जैन याना पत्रकारानी स्वाभाविकच छेडले. त्यावेळी ते म्हणाले, 'हेमा-संजीवचा काही प्रश्न नव्हता. प्रश्न फायनान्सचा होता!' त्यानी हिरो-हिरॉयनीच्या बेबनावामुळे चित्र अपुरे राहात नाही याची अनेक उदाहरणे दिली. 'संजीव-नूतन याचे प्रकरण झाले व नूतनने संजीवच्या थोबाडीत मारली. त्यानतर 'देवी' या चित्राचे ३३ दिवस चित्रण झालेच की नाही. 'वैजयंतीमाला आणि दिलीपकुमार कधीही बोलत नसत, तरी त्यांनी 'संघर्ष' पूर्ण केलाच की नाही. काही असले तरी माझ्या चित्रातील जी रिळे पूर्ण झाली त्यामध्ये संजीव-हेमा यांच्या कामाचा बहुतेक भाग पूर्ण झालाच आहे. एकूण संजीव-हेमा अधिक फायनान्स मिळाल्यानंतर 'धूप-छाँव'मध्ये काय कमी होते. हां! एक योगिताबाली कमी पडली होती. ती पण आता भरीस आली आहे. ■ ■

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# सांध्यवेळच्या तेजासारखे तिमिरावगुंठित असे ते वेगवान जीवन

◻ आपल्या टॉलस्टॉय विषयक अभ्यासाचा व सुंदर भावपूर्ण गद्य-शैलीचा माझ्या मनावर फार उत्तम असा प्रभाव पडला. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आमच्या ग्रंथालयात घेतले जाईलच व मी ते अगत्यपूर्वक वाचीन.

**भाकर माचवे**, दिल्ली

◻ वास्तविक तुम्ही लिहिलेल्या टॉलस्टॉयच्या चरित्राचे हस्तलिखित वाचल्यावर मीच तुम्हाला पत्र लिहायला हवे होते. मला तुमचे लेखन अतिशय आवडले. जगातल्या निरनिराळ्या क्रांत्या-उत्क्रांत्यांनी म्हणा, किंवा सामाजिक, राजकीय इत्यादी स्तरावर मांडलेल्या गणितांची उत्तरे सापडल्याच्या आनंदात असणाऱ्या विचारवंतांना ती चुकीची निघाल्याचा अनुभव येऊ लागल्यामुळे म्हणा, विचारवंत पुन्हा एकदा गांधी-टॉलस्टॉय यासारख्या ऋषीवर्यांकडे वाट पुसायला जाणार असे मला वाटू लागले आहे. तुमच्या आगामी ग्रंथाचे म्हणून मला फार मोठे मोल वाटले.

**पु. ल. देशपांडे**, पुणे

◻ टॉलस्टॉयविषयी एकदा पुष्कळ वाचले आहे पण केवळ माणूस या नात्याने ५०० छापील पाने भरण्याइतका मजकूर काय असेल याची उत्सुकता माझ्या ठिकाणी उत्पन्न झाली आहे.

**न. र. फाटक**, मुंबई

◻ टॉलस्टॉय या विषयावर लेखिकेने केलेल्या सर्वांगिण वाचनाचा मराठी वाचकांना फार उपयोग होईल, असा मला भरवसा वाटतो. शैलीमुळे ग्रंथ कादंबरीसारखा रंजक वाटेल.

**श्री. के. क्षीरसागर**, पुणे

◻ I find the writing very gripping and perspective. I am looking forward to the publication of the book with great interest.

**S. B. Kulkarni**
Divisional Commissioner, Poona.

◻ टॉलस्टॉयचा शोध घेण्याचा प्रयत्न लेखिकेने खूपच कसोशीने केला आहे यात शंका नाही.

**अशोक दा. रानडे**, मुंबई

◻ मराठी भाषेत एक अमोल ग्रंथ लिहिलात यात काडीमात्र शंका नाही. हा ग्रंथ एक नमुनेदार चरित्रग्रंथ म्हणून नावाजला जाईल, अनेकांना तो स्फुरण देणारा ठरेल, अनेकांना त्यांच्या जीवनाच्या विसाव्याचे स्थान या ग्रंथात सापडेल असे मला वाटते.

**वि. वि. पेंडसे**, ज्ञानप्रबोधिनी, पुणे

◻ असंच काही भरीव, लोभस विचारधन आम्हाला वाचायला देत चला.

**सौ. सुमन पंढरीनाथ रानडे**, औरंगाबाद

◻ परवाच्या मंडळाच्या सभेत या ग्रंथाबद्दल प्रशंसोद्गारच निघाले.

**अनंत काणेकर**, मुंबई

◻ टॉलस्टॉयने जीवनात जितक्या चुका आणि जेवढी क्रूर कृत्ये समजून न समजून केली तशी कुणी केली नसतील. टॉलस्टॉयने जेवढ्या तळमळीने जीवनाचे गूढ व जीवनाची प्रेरणा समजून घेण्याचा प्रयत्न केला तसाही क्वचित कुणी महाभाग करतो. पाप-पुण्याच्या संघर्षाच्या ठिणग्या त्याच्या मनात जशा पेटल्या तशाही कुणा लेखकाच्या मनात क्वचितच पेटतात. मृत्यूचा जीवनभर कानोसा घेणारा हा माणूस सतत सद्सद्विवेकाचा वेध घेत राहिला. सांध्यवेळच्या तेजासारखे तिमिरावगुंठित असे ते वेगवान जीवन काळमुखात कसे शिरते याचा प्रत्यय सौ. सुमती देवस्थळे आपल्याला आणून देतात.

**दुर्गाबाई भागवत**, मुंबई

◻ सौ. सुमती देवस्थळे यांनी लिहिलेला 'टॉलस्टॉय-एक माणूस' हा ग्रंथ येत्या ऑगस्ट-सप्टेंबरात प्रसिद्ध होत आहे.

◻ साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिल्यामुळे या पाचशे पानांच्या ग्रंथाची किंमत पंचवीस रुपये ठेवणे शक्य झाले आहे. एरवी आजच्या भीषण टंचाई-महागाईच्या काळात ही किंमत सहजच रुपये पन्नासपर्यंत ठेवावी लागली असती.

◻ मंडळाच्या नियमाप्रमाणे ही प्रथमावृत्ती फार मर्यादित प्रतींची काढावी लागत आहे. ग्रंथाचे जे सर्व थरातून स्वागत होत आहे ते पाहता दुसऱ्या आवृत्तीचाही योग संभवतो. पण असा योग आला तरी या दुसऱ्या आवृत्तीची किंमत वर म्हटल्याप्रमाणे भरमसाट राहाणार हे उघड आहे. म्हणून शक्यतो या पहिल्या आवृत्तीची प्रतच हस्तगत करणे सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने इष्ट आहे.

◻ १५ ऑगस्टपर्यंत नोंदणी करणाऱ्यांना आणखी थोडी सवलत देता येईल. पाच रुपये कमी पाठवावेत. रुपये पंचवीस ऐवजी वीस फक्त. रुपये वीस मात्र ताबडतोब पाठवावेत.

◻ ग्रंथ राजहंस प्रकाशन कार्यालयातून नेण्याची व्यवस्था किंवा पोस्ट पाठवणी खर्च ज्याचा त्याने करावयाचा आहे.

◻ साप्ताहिक माणूसची वर्गणी म्हणून रुपये शंभर भरणाऱ्यास अडीच वर्षे अंक, शिवाय हा ग्रंथ देण्याची सवलत अजूनही काही दिवस चालू आहे..

**टॉलस्टॉय एक माणूस** | **प्रथमावृत्ती : १९७४** | **राजहंस प्रकाशन**
**सौ. सुमती देवस्थळे** | **किंमत रुपये पंचवीस** | **१०२५ सदाशिव, पुणे ३०**